*मराठी ज्युनिअर (इयत्ता ५ ते ७)*

***विशेष सूचना :***

*१. प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.*

*२. कृपया विषयास धरून बोलावे.*

*३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे:*

*(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता: १० गुण (क) प्रभाव : १० गुण*

# १. तेजस्वी नरेन आणि त्याचे अद्वितीय गुरु

दक्षिणेश्वरी नरेन अतिशय आनंदात असायचा. त्याच्यातला लहान मुलासारखा अवखळपणा उफाळून यायचा. जणू सिंहासारख्या आपल्या बलदंड पित्याच्या सान्निध्यात खेळणारा लाडका छावाच! आतापर्यंत त्याच्या मनातली आणि हृदयातली दबून राहिलेली उर्जा अर्धप्रकट झाली होती. त्यामुळे त्याला प्रचंड मनस्तापाला आणि अनेक वादळांना तोंड द्यावे लागले होते. ही अर्धप्रकट उर्जा आता पूर्णपणे उफाळून बाहेर आली, ती एका जबरदस्त आध्यात्मिक प्रवाहाच्या स्वरुपात. श्रीरामकृष्णांना हे सारे कळत असे आणि त्याचा त्यांना शब्दातीत आनंद होई. नरेनच्या आत्मिक शक्तीचा उत्तुंग विकास त्यांना स्पष्टपणे दिसत होता. श्रीरामकृष्ण प्रदीर्घ आध्यात्मिक अनुभवाने संपन्न झालेल्या सम्राटासारखे होते आणि नरेन होता हा आध्यात्मिक वारसा लाभलेला, उत्साहाने भारलेला सळसळत्या रक्ताचा युवराज!

गुरुदेवांनी नरेनच्या मनातल्या आंतरिक शक्तीला पूर्णपणे वाव दिला आणि नरेनच्या मनालाच त्याचे गुरुपद बहाल केले. गुरुदेवांची अशी धारणा होती की हृदयाचा सच्चेपणाच मनाला हळूहळू प्रकाशित करतो. नरेनने कधी गुरुदेवांवर संशय घेतला तर कधी त्यांची परीक्षाही घेतली, तरीही गुरुदेवांनी ते आनंदाने स्वीकारले. ते म्हणत, "मी म्हणतो म्हणून कोणतीही गोष्ट स्वीकारू नकोस. तू स्वतः ती तपासून घे."

नरेनने याच गोष्टीचा पाठपुरावा केला. परंतु त्यासाठी श्रीरामकृष्णांना प्रचंड सहनशक्ती दाखवावी लागली आणि नरेनलाही अनेक यातनामय प्रसंगांतून जावे लागले.

खरंतर सर्व शिष्यांपैकी नरेंद्रनाथच श्रीरामकृष्णांची महती समजू शकला. त्यांच्याबद्दल संशय घेण्याचे धाडस नरेनच दाखवी. श्रीरामकृष्णांचा प्रत्येक शब्दन्‌शब्द तो बुद्धीच्या ताजव्यात जोखून घेत असत आणि शंकामुक्त होत असे.

इतर शिष्य गुरुदेवांचे म्हणणे, त्यांचे शब्द एकाग्रतेने ऐकत. ते खरे भक्त होते. गुरुदेवांवरील प्रेमापोटी ते त्यांच्या शब्दांवर संपूर्ण विश्वास ठेवत. श्रीरामकृष्णांचे मनाला चटका लावणारे प्रेम त्यांना माहीत होते. परंतु नरेन गुरुदेवांना प्रश्न विचारून भंडावून सोडायचा. हसत हसत त्यांच्या विधानांवर टीका करायचा. इतर शिष्यांप्रमाणे नरेनचेही गुरुदेवांवर अतिशय प्रेम होते. ह्या प्रेमापोटीच तो गुरुदेवांचा आदर करीत असे. त्यांना सन्मान देत असे. परंतु श्रीरामकृष्णांची शिकवण बुद्धीच्या निकषावर पारखून घेतल्याशिवाय मान्य करीत नसे.

नरेनच्या ठायी असलेली शक्ती ही अंशत: बौद्धिक व अंशत: आध्यात्मिक अशी होती. त्यामुळेच श्रीरामकृष्णांना नरेनबद्दल खूपच आदर वाटायचा. होय! नरेनमधली हीच शिवशक्ती, हा शिवभाव गुरुदेवांना खूप भावायचा.

एकदा नरेनकडे बोट दाखवून ते आपल्या सभोवारच्या शिष्यमंडळींना म्हणाले होते, "पाहा हा नरेन! त्याच्या ठायी किती सशक्त अंतर्दृष्टी आहे! जणू अमर्याद असा ज्ञानसागरच!" थोड्या वेळाने ते कालीमातेची प्रार्थना करू लागले, "हे माते! ह्याच्या ज्ञानाच्या तेजाला आवार घाल. त्याशिवाय तो काम कसे करणार?" ते पुढे म्हणाले, "हे माते, तुझी थोडी माया या नरेनच्या देहात घाल बरे! नाहीतर त्याच्या मूळ स्वभावाप्रमाणे तो स्वत:च्या मुक्तीचाच विचार करेल. तो सदैव ध्यानात मग्न राहील

आणि फक्त परमसत्याचाच विचार करेल. जग त्याला गमावून बसेल."

श्रीरामकृष्णांनी नरेनचे केलेले मूल्यांकन इतर शिष्यांनाही पटत होते. श्रीरामकृष्ण म्हणत, "नरेनच्या ठायी अठरा प्रकारच्या असामान्य शक्ती वास करीत आहेत. साधारण माणसाकडे यांपैकी दोन शक्ती असल्या तरी तो साऱ्या जगात असामान्य व्यक्ती म्हणून नावलौकीक प्राप्त करेल." किंवा ते म्हणत, "नरेन म्हणजे साक्षात धगधगता अंगार! सारे मालिन्य आणि अमंगलतेचे भस्म करणारा!" श्रीरामकृष्णांच्या अशा वचनांवर अविश्वास कोण कसा दाखवणार?

श्रीरामकृष्णांची शिकवण्याची पद्धतही विलक्षण होती. शिष्यांनी वाद घातला तर ते त्यात कधीही पडत नसत. एखादा शब्द, एखादा दृष्टिक्षेप, एखादे गाणे यांचा वापर करून ते बरेच काही शिकवून जात. ही शिकवण म्हणजे, 'आत्मज्ञान हेच एकमेव ध्येय! हृदयकमलात जेव्हा आत्मज्ञान उमलते तेव्हा सारे आक्षेप गळून पडतात. ईश्वरज्ञानाचा प्रकाश सर्वत्र पसरतो.'

एके दिवशी नरेन आणि इतर शिष्य यांच्यातला वाद पराकोटीला पोहोचला. ईश्वर साकार आहे की निराकार? ईश्वर खरेच अवतार घेतो की अवतार ही एक केवळ मिथ्य कल्पना आहे? या विषयावर सर्वांनी भरपूर वादविवाद केला. संपूर्ण वेद आणि वेदान्तातील मुद्द्यांवर खंडन झाले. ह्या वादात नरेनचा विजय झाला. साऱ्यांचे मुद्दे नरेनने खोडून काढले. एवढ्यात श्रीरामकृष्ण तेथे आले. त्यांच्या ओठातून बाहेर पडणारे मधुर गाणे साऱ्यांच्या कानी आले. त्या गाण्याचा भावार्थ होता – "रे माझ्या मना! त्याचा (ईश्वराचा) साक्षात्कार होण्यासाठी कोणते बरे प्रयत्न उपयोगी पडतील? आता तर तू एखाद्या काळोख्या खोलीत चाचपणाऱ्या वेड्या माणसाप्रमाणे धडपडतो आहेस! तो ईश्वर ना षट्दर्शनांमध्ये मिळेल, ना तंत्रांमध्ये, ना वेदांमध्ये! त्या ईश्वराला आवडते ते म्हणजे मधुर प्रेम!"

आतापर्यंत वाद घालणारे शिष्य स्तब्ध आणि भावविभोर झाले.

त्यांच्या मनातल्या साऱ्या प्रश्नांचे उत्तर मिळाले होते. खरेच, श्रीरामकृष्ण असे गुरु होते की जे फक्त आत्मानुभूतीच्या भाषेतच बोलत. त्यांना प्रत्यक्ष सत्याचे दर्शन झाले होते. मानवी मनाला जे प्रश्न कायम विवाद्य असतील त्याच्यावर शब्दच्छल करीत चर्चा करायची गरज काय? भगवान बुद्धांप्रमाणे श्रीरामकृष्णांनाही तर्काधार फारसा उपयोगी नव्हता. सूक्ष्म सिद्धांत शब्दांमध्ये मांडणे म्हणजे काही आध्यात्मिकता नाही. आध्यात्मिकता म्हणजे अनुभूती. आध्यात्मिकता म्हणजे चारित्र्य. काम कांचनावर विजय!

अशा वादविवादात गुरुदेव सहसा मध्ये पडत नसत. वादविवाद कितीही उच्चकोटीचा असला तरी ते मध्ये बोलत नसत. ते वाद घालणाऱ्यांनाच बोलू देत. त्या वादातूनच ते अधिक चांगले शिकतील असे ते म्हणत. कधी कधी त्या वादांची त्यांना गंमतही वाटायची. त्या वादांमुळे आपल्या शिष्यांची आध्यात्मिक पातळीही गुरुदेवांना जोखता येई. खरोखरच गुरुदेवांचा सहवास म्हणजे आत्म्यासाठी असलेली भव्य शाळाच होती. व्यक्तिमत्व विकासाला प्रोत्साहित करणारी शाळा! प्रत्येकाला आपल्यातले सुप्तगुण शोधून ते पूर्णपणे विकसित करण्याचे तिथे स्वातंत्र्य होते.

परंतु कधी कधी श्रीरामकृष्ण या वादविवादात हस्तक्षेप करीत. उदाहरणार्थ, नरेनचे उच्च विचार जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या मर्यादित दृष्टिकोनाला हाणून पाडत असे, तेव्हा ते जरुर हस्तक्षेप करत.

एकदा वादविवादात नरेनने आत्ममुक्तीसाठी श्रद्धा उपयोगी नाही असा हल्ला चढवला. नरेनने पुढे अंधश्रद्धेचा उल्लेख केला. त्यावर गुरुदेव म्हणाले, "नरेन! 'अंधश्रद्धा' म्हणजे काय? श्रद्धा ही अंधच असते. तिला काय डोळे असतात? एकतर श्रद्धा म्हण किंवा ज्ञान म्हण! श्रद्धेचे डोळस आणि अंध असे भाग तू कसे करतोस?"

हळूहळू नरेनला हे ठामपणे कळून चुकले – आत्मसाक्षात्कार,

आत्मानुभूती म्हणजेच खरा धर्म! माणसाला ईश्वर दर्शन झालेच पाहिजे! परमसत्याचा विचार करणे चांगलेच आहे. पण प्रत्यक्ष सत्यदर्शन घडणे हे जास्त श्रेयस्कर आहे. परंतु हे घडून यायला वेळही लागला आणि धैर्यही लागले.

आत्मशांती प्राप्त करणे हीच श्रीरामकृष्णांची स्पष्ट शिकवण आहे हे नरेनच्या लक्षात आले. संभाषणाच्या ओघात कधी कधी श्रीरामकृष्णांच्या मुखातून थेट आत्म्याला भिडणारे बोल निघत असत. तर कधी कधी ते शिष्यांना वादविवाद करण्यात मग्न राहू देत. वाद संपला की श्रीरामकृष्ण त्यांना गाढ समाधीत बुडून गेलेले दिसत. शिष्यांना काही दिवसांनी कळून चुकले की ही श्रीरामकृष्णांची त्यांच्या वादविवादाला निषेध व्यक्त करण्याची पद्धत होती. श्रीरामकृष्णांचे चारित्र्य आणि त्यांच्या वैयक्तिक जीवनातील आध्यात्मिक तेज हेच त्यांच्या शिकवणुकीमागची शक्ती होती.

वैश्विक प्रेम आणि सहिष्णुता शिकवणारे हे महापुरुष त्या गोष्टी प्रत्यक्ष जगत होते, आपल्या जीवनात आचरणात आणत होते. श्रीरामकृष्णांनी कोणत्याही सामाजिक रुढीवर वा प्रथेवर आघात केला नाही. जातीविरोधात ते कधीही काही बोलले नाही. स्वत: ब्राह्मण कुलातील असूनही समाजातल्या तळागाळातल्या असंख्य पददलितांबद्दल त्यांच्या मनात प्रेम होते. अत्यंत खालच्या स्तरावरील व्यक्तीसुद्धा जे अतिक्षुद्र काम करायला कचरत, असे काम करून त्यांनी आपली आत्यंतिक नम्रता दाखवून दिली.

ईश्वरदर्शन कसे होईल? आत्मज्ञानाचे मार्ग कोणते? प्रार्थना कशी करावी? या प्रश्नांची श्रीरामकृष्णांनी काय उत्तरे दिली होती? ते म्हणत, "प्रार्थना कशीही करा! मुंगीचा पायरवही ईश्वराला ऐकू येतो. ईश्वराचा शोध कसा घ्यावा? काम आणि कांचनावर विजय मिळवून, त्यांचा त्याग करून!" प्रामाणिकपणा, हेच त्यांच्या शिकवणुकीचे मर्म होते. प्रामाणिकपणाशिवाय काहीच शक्य नाही. प्रामाणिकपणा असेल तरच सर्व साध्य होईल. नरेनला आणि इतर शिष्यांना ते म्हणत, "ईश्वरप्राप्तीसाठी

मी जेवढे केले त्याच्यामधील रुपयातील एक आण्याएवढे जरी तुम्ही केले तरी तुम्ही कायमचे धन्य व्हाल."

ईश्वर साकार की निराकार?" ईश्वर साकारही आहे आणि निराकारही आहे. आणि तो त्या दोघांपलीकडे ही आहे. बुद्धी आणि तत्त्वज्ञानाच्या पलिकडे तो आहे! आत्म्याला साक्षात्कार झाल्यावर तो भक्तापुढे प्रकट होतो. आपल्या भक्तासाठी ईश्वर कोणतेही रूप घ्यायला तयार असतो. तो अवर्णनीय आहे. पुस्तकांच्या पानांमध्ये आणि देवळाच्या भिंतीच्या आत तो तुम्हाला आढळणार नाही."

मूर्तीपूजा योग्य की अयोग्य ? श्रीरामकृष्णांच्या मते हा वायफळ प्रश्न होता. "ईश्वराच्या दर्शनासाठी केलेली कशाचीही पूजा योग्यच म्हणायला हवी! गरज असते ती फक्त आत्यंतिक तळमळीची!"

* * *

*मराठी ज्युनिअर (इयत्ता ५ ते ७)*

***विशेष सूचना :***

*१. प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.*

*२. कृपया विषयास धरून बोलावे.*

*३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे:*

*(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता: १० गुण (क) प्रभाव : १० गुण*

# २. १८९३... शिकागो विश्व-धर्मपरिषदेत

जेव्हां स्वामी विवेकानंद, जुलै १८९३ च्या शेवटी विश्व-धर्मपरिषदेत भाग घेण्यासाठी शिकागो येथे पोहोचले, तेव्हां माहिती कार्यालयाकडून (Information Bureau) त्यांना हे कळून मोठा धक्का बसला की तो कार्यक्रम सप्टेंबरपर्यंत सुरु होणार नाही आणि कोणत्याही अधिकृत संस्थेच्या योग्य प्रमाणपत्राशिवाय कोणत्याही प्रतिनिधीला प्रवेश दिला जाणार नाही, मद्रास येथील त्यांच्या शिष्यांनी त्यांच्या अथांग उत्साहात आणि श्रद्धेपोटी असे गृहीत धरले होते की स्वामीजींनी फक्त तिथे उपस्थित राहायचे आहे आणि त्यांना संधी दिली जाईल. स्वामीजींनीही वाटेतील अडचणींचा अंदाज लावला नव्हता, कारण आपल्याला एका दैवी मोहिमेच्या पूर्ततेसाठी पाठवले जात आहे यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता.

शिकागोमध्ये राहणे खूप महाग आहे हे स्वामीजींच्या लक्षात आले. त्यांच्याकडे पुरेसे पैसे नसल्यामुळे ते बोस्टनला रवाना झाले, जिथे गोष्टी स्वस्त होत्या. वाटेत, ट्रेनमध्ये, एक श्रीमंत प्रवासी, मिस कॅथरीन ॲबट सॅनबॉर्न त्यांच्या भव्य व्यक्तिमत्त्वाने आणि मोहक संभाषणाने प्रभावित झाल्या. स्वामीजींच्या अमेरिका भेटीचा उद्देश समजल्यावर त्यांना अधिक रस वाटू लागला. त्यांनी स्वामीजींना त्यांच्या घरी राहण्याचे आमंत्रण दिले. हे आमंत्रण स्वामीजींसाठी ईश्वरी वरदान ठरले, त्यांनी लगेच होकार दिला आणि बोस्टनजवळील त्यांच्या ग्रामीण भागातील घरी राहण्यास गेले.

मिस सॅनबॉर्न यांच्या माध्यमातून स्वामीर्जीची ओळख हार्वर्ड विद्यापीठातील ग्रीक भाषेचे प्राध्यापक, श्री. जे. एच. राईट ह्यांच्याशी झाली स्वामीर्जीसोबतच्या चार तासांच्या संभाषणानंतर प्राध्यापक त्यांच्या विद्वता आणि ज्ञानाने इतके प्रभावित झाले की त्यांनी स्वामीर्जीना प्रतिनिधी म्हणून धर्मपरिषदेत प्रवेश मिळवून देण्याची जबाबदारी स्वत:वर घेतली. "संपूर्ण राष्ट्राला तुमची ओळख करून देण्याचा हा एकमेव मार्ग आहे", ते स्वामीजींना म्हणाले. स्वामीजींनी आपल्या अडचणी स्पष्ट केल्या आणि सांगितले की त्यांच्याकडे कोणतेही प्रमाणपत्र नाही. त्यावर प्रोफेसर राईट उद्गारले, "स्वामीजी, तुम्हाला प्रमाणपत्राबद्दल विचारणे म्हणजे सूर्याला प्रकाश देण्याच्या त्याच्या अधिकाराबद्दल विचारण्यासारखे आहे" त्यांनी लगेच प्रतिनिधी निवड समितीच्या अध्यक्षांना लिहिले "येथे अशी एक व्यक्ति आहे जी आपल्या सर्व प्राध्यापकांच्या तुलनेत अधिक विद्वान आहे". त्यांनी स्वामीजींना पौर्वात्य प्रतिनिधींची काळजी घेणाऱ्या समितीसाठी ओळख पत्र ही दिले आणि त्यांन शिकागोचे तिकीटही काढून दिले.

दुर्दैवाने, जेव्हां स्वामीजी ९ सप्टेंबरला शिकागोला पोहोचले, तेव्हां त्यांना धक्का बसला कारण त्यांच्याकडून समितीचा पत्ता गहाळ झाला होता. त्यांनी येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांकडे चौकशी केली, परंतु तो शहराचा ईशान्य भाग होता जिथे बहुतांश जर्मन लोक राहत होते. त्यांना स्वामीजींचे बोलणे समजले नाही. सप्टेंबरच्या थंड रात्री सुरू होत होत्या. रेल्वे मालवाहू यार्डातील (railroad freight yard) एका रिकाम्या डब्यात (boxcar) आश्रय घेण्याशिवाय स्वामीजींकडे दुसरा पर्याय नव्हता. पण लवकरच त्यांनी स्वत:ला सर्व चिंतांमधून मुक्त केले आणि प्रभूच्या नियोजनावर विश्वास ठेवून तिथेच शांतपणे झोपले.

सकाळ होताच स्वामीजी समितीचा पत्ता शोधण्यासाठी बाहेर पडले लवकरच ते शहराच्या एका श्रीमंत भागात आले. अत्यंत थकलेले आणि भुकेलेले असल्यामुळे, त्यांनी भारतातील संन्याशाप्रमाणे घरोघरी जाऊन मदत मागितली. त्यांचे मळलेले कपडे आणि थकलेला अवतार पाहून

घरातील नोकरांनी त्यांच्याशी उद्धटपणे वर्तन केले, काहींनी तर त्यांच्या तोंडावर दरवाजा बंद केला. काही वेळानंतर, हताश होऊन, स्वतःला प्रभुंच्या इच्छेवर सोपवून, ते रस्त्याच्या कडेला बसले.

स्वामीजी रस्त्याच्या कडेला बसले असतानाच, त्यांच्या समोरील एका आलिशान घराचा दरवाजा उघडला आणि राजेशाही थाट असलेली एक महिला बाहेर आली आणि अत्यंत नम्र आवाजात स्वामीजींना विचारले, "सर, आपण सर्व-धर्मपरिषदेत सहभाग घेण्यासाठी आला आहात का?" स्वामीजींनी त्यांना आपल्या अडचणी सांगितल्या. त्या महिलेने त्वरित स्वामीजींना आपल्या घरात आमंत्रित केले आणि त्यांचा पाहुणचार केला. नंतर, जेव्हां स्वामीजींनी भोजन केले आणि अंमळ विश्रांती घेतली, तेव्हां त्यांनी स्वामीजींना सर्व-धर्मपरिषदेच्या कार्यालयात नेले. स्वामीजींना सहर्षपणे प्रतिनिधी म्हणून स्वीकारण्यात आले आणि इतर पौर्वात्य पाहुण्यांसोबत त्यांची राहण्याची सोय करण्यात आली. स्वामीजींच्या पाठीशी उभ्या राहिलेल्या महिला मिसेस जॉर्ज डब्ल्यू. हेल ह्या होत्या. कालांतराने मिसेस हेल आणि त्यांची मुले स्वामीजींचे जिवलग मित्र बनले.

आता स्वामीजींमध्ये एका नवीन चैतन्याचा संचार झाला होता. प्रभू आपल्या पाठीशी आहेत ह्यावर त्यांचा पूर्ण विश्वास बसला होता स्वामीजींचे दिवस प्रार्थना, ध्यान व अशा तीव्र व्याकुळतेत व्यतीत झाले की ते ईश्वराचे खरे साधन, हिंदु धर्माचे खरे प्रवक्ते व आपल्या गुरुदेवांच्या संदेशाचे खरे वाहक बनावेत.

विश्व-धर्मपरिषद ही 'वर्ल्डस् कोलंबियन एक्स्पोझिशन'चा एक भाग होती, जी ख्रिस्तोफर कोलंबसने अमेरिकेचा शोध लावल्याच्या ४००व्या वर्धापनदिनानिमित १८९३ मध्ये शिकागो येथे आयोजित करण्यात आली होती. जगातील विविध धर्मांनी शिकवलेली महत्त्वाची सत्ये मांडणे आणि पृथ्वीवरील राष्ट्रांमध्ये अधिक मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करणे ही ह्या परिषदेची काही घोषित उद्दिष्टे होती. परंतु अनेकांना असे वाटत होते आणि आशा होती की ही परिषद त्यांच्या स्वतःच्या धर्माचे श्रेष्ठत्व

सिद्ध करेल. तथापि, ईश्वरी योजनेमुळे सर्व धर्मांची वैधता हाच अखेर परिषदेचा मुख्य सूर बनला आणि स्वामी विवेकानंद या केंद्रीय संकल्पनेचे सर्वात प्रभावी आणि ओजस्वी प्रवक्ते बनले

विश्व-धर्मपरिषदेचे पहिले सत्र, सोमवार, ११ सप्टेंबर १८९३ रोजी आर्ट इन्स्टिट्यूटच्या प्रशस्त सभागृहात पार पडले. सभागृह युनायटेड स्टेट्समधील सर्वोतम संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ४,००० हून अधिक स्त्री-पुरुषांनी खचाखच भरले होते. बौद्ध, ख्रिश्चन, कन्फ्यूशियस, हिंदू, जैन, ज्यू, इस्लाम, शिंतो, ब्राह्मो समाज आणि झोराष्ट्रीयन (पारशी), अशा सर्व संघटित धर्मांचे प्रतिनिधी तिथे उपस्थित होते आणि त्या सर्वांमध्ये मूक प्रार्थनेत मग्न असलेले स्वामी विवेकानंद आपल्या प्रभावी उपस्थितीने सर्व श्रोत्यांचे लक्ष वेधून घेत होते.

परिषदेची सुरुवात प्रार्थनेने झाली. त्यानंतर अध्यक्ष, रेव्हरंड जे. एच. बॅरोज ह्यांनी एक-एक करून प्रतिनिधींची ओळख करून दिली, ज्यांनी नंतर आपले तयार केलेले भाषण वाचून दाखवले. पण स्वामीजींकडे असे कोणतेही लेखी भाषण नव्हते आणि त्यांनी ह्यापूर्वी कधीही एवढ्या मोठ्या सभेला संबोधित केले नव्हते. ते सकाळच्या सत्रात बोलले नाहीत आणि अध्यक्षांचे बोलावणे सतत पुढे ढकलत राहिले.

दुपारच्या सत्रात, जेव्हां त्यांना आपली पाळी अधिक पुढे ढकलणे शक्य झाले नाही, तेव्हां स्वामीजी व्यासपीठावर आले. त्यांचा चेहरा अग्नीसारखा तेजस्वी दिसत होता. ज्ञानाची देवी, सरस्वतीमातेला मनोमन नमन करून त्यांनी बोलायला सुरुवात केली. सभेला, 'अमेरिकेतील भगिनींनो आणि बंधूंनो,' अशी साद घालताच, श्रोत्यांमध्ये उत्साहाची प्रचंड मोठी लाट उसळली. प्रेक्षक जणू भारावून आपल्या जागेवर उभे राहून, टाळयांचा कडकडाट करत राहिले प्रत्येकजण फक्त टाळया वाजवत जल्लोष करत होता!!! स्वामीजी चकित झाले. पूर्ण दोन मिनिटे त्यांनी बोलण्याचा प्रयत्न केला, पण श्रोत्यांच्या उत्स्फूर्त उत्साहामुळे त्यांना ते शक्य झाले नाही. इतर वक्त्यांनी त्यांना पारंपारिक पद्धतीने संबोधित केले

होते, परंतु स्वामीजींनी औपचारिकता बाजूला ठेवून लोकांच्या आंतरिक नातेसंबंधावर भर देऊन त्यांच्या ह्रदयाचा ठाव घेतला होता. टाळयांचा कडकडाट थांबल्यानंतर त्यांनी संक्षिप्त भाषण केले.

स्वामीजींचे भाषण संपले आणि भावनिक थकव्यामुळे ते खाली बसले. त्यानंतरही पुन्हा एकदा टाळयांचा प्रचंड कडकडाट झाला. दुसऱ्या दिवशी सर्व वृत्तपत्रांनी परिषदेतील सर्वात महान व्यक्ती आणि सर्वोत्कृष्ट वक्ता म्हणून त्यांचे कौतुक केले. एक अज्ञात तरुण संन्यासी संपूर्ण संयुक्त अमेरिकेमध्ये प्रसिद्ध झाला होता. शिकागोमध्ये रस्त्याच्या कडेला, ठिकठिकाणी त्यांचे महाकाय पोस्टर्स लावले गेले, ज्यांच्या खाली त्यांचे नाव लिहिले होते आणि अनेक जण त्या फोटोसमोर नतमस्तक होऊन त्यांच्याबद्दल आदर व्यक्त करीत.

त्यानंतर परिषदेतील आपल्या भाषणांमध्ये स्वामी विवेकानंदांनी सर्व धर्माची वैधता आणि त्यांच्यातील सुसंवाद ह्या कल्पनेवर वारंवार भर दिला त्यांनी प्रत्येक व्यक्तीला स्वत:ची वैयक्तिक ओळख जपण्याची आणि त्याच वेळी इतर धर्मातील चांगल्या गोष्टी शिकण्याची आणि त्यांच्यातील मूळ भावना आत्मसात करण्याचे आवाहन केले.

२७ सप्टेंबर १८९३ रोजी, परिषदेच्या अंतिम सत्रातील समारोपाच्या भाषणात, स्वामीजींनी जागतिक शांतता आणि एकात्मता वाढवण्यासाठी एवढ्या भव्य आणि उदात्त कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले आणि त्यांचे अभिनंदन केले त्याचबरोबर त्यांनी उपस्थितांचे त्यांच्या विनम्र आणि मन:पूत पाठिंब्यासाठी आभार मानले.

सरतेशेवटी स्वामी विवेकानंद म्हणाले, "ह्या सर्वधर्मपरिषदेने जर काही जगाच्या निदर्शनास आणले असेल तर ते हेच......

तिने अत्यंत सुंदर रीतीने हे सिद्ध करून दाखविले आहे की पावित्र्य, चितशुद्धी, दयादाक्षिण्य वगैरे गुणांचा मक्ता जगातील कोणत्याही एका विशिष्ट धर्माने घेतलेला नाही. प्रत्येक धर्मात अति उदात्त चारित्र्याच्या

स्त्री–पुरुषांचा जन्म झाला आहे. हा एवढा भरभक्कम पुरावा दृष्टीसमोर असूनही, आपलाच तेवढा धर्म शेवटी जिवंत राहून, इतर धर्म नष्ट होतील असे मनोराज्य कुणी रचीत असेल तर त्या अभाग्याची आपण कीवच केली पाहिजे. त्या बापड्याला मी अगदी स्पष्ट शब्दांत बजावून ठेवतो की, त्याच्यासारख्या लोकांनी कितीही अडथळे उभे केले तरी त्या साऱ्यांना तिळमात्र न जुमानता, प्रत्येक धर्माच्या पताकेवर स्वर्णाक्षराने लवकरच लिहिले जाईल........

**'संघर्ष नको, परस्परांना साहाय्य करा; 'आत्मसात करा, विनाश करू नका'; 'कलह नको, मैत्री हवी, शांती हवी'!!!**

* * *

***मराठी ज्युनिअर (इयत्ता ५ ते ७)***

***विशेष सूचना :***

*१. प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.*

*२. कृपया विषयास धरून बोलावे.*

*३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे:*

*(अ) मजकूर : ३० गुण   (ब) स्पष्टता: १० गुण   (क) प्रभाव : १० गुण*

# ३. खरी पूजा

रामनद येथील मुक्कामात स्वामी विवेकानंद एक दिवस रामेश्वर मंदिरात देवदर्शनार्थ गेले होते. तेथे जमलेल्या लोकांना त्यांनी काही सांगावे अशी आग्रहाची विनंती केली गेली. त्या प्रसंगी स्वामीजींनी पुढीलप्रमाणे भाषण दिले:-

धर्म हा अनुरागात असतो, अनुष्ठानात नव्हे. हृदयातील पवित्र आणि निष्कपट प्रेमातच धर्माचे अधिष्ठान असते. जर देह आणि मन शुद्ध नसतील तर मंदिरात जाऊन शिवपूजा करणे व्यर्थ होय. ज्यांची देह-मने पवित्र असतात, शिव त्यांचीच प्रार्थना ऐकतात. आणि जे अशुद्ध स्वभावाचे असूनही दुसऱ्याला धर्म शिकवू जातात त्यांना दुर्गती लाभते. बाह्य पूजा ही मानस पूजेचे केवळ बहिरंग आहे - मानस पूजा आणि चित्तशुद्धी ह्याच महत्त्वाच्या गोष्टी होत. त्या नसल्यास बाह्य पूजा करून काही लाभ नाही.

ह्या कलियुगात लोक इतके अवनत होऊन गेले आहेत की त्यांना वाटते की आपण एरवी हवे तसे वागू, तीर्थस्थानी जाताच आपली सगळी पापे धुऊन निघतील. परंतु वस्तूत: कुणी जर अपवित्र भावाने एखाद्या तीर्थाला जाईल तर तिथे जमा झालेले इतर सगळयां लोकांचे पाप त्याच्या मानगुटीला येऊन बसते- पापाचा आधीपेक्षा आणखी मोठा बोजा खांद्यावर घेऊन त्याला घरी परतावे लागते. तीर्थस्थानी साधुसंत वास करतात, पवित्र

भाव जागवितील अशा आणखीही कितीतरी गोष्टी तिथे असतात. परंतु असे जर एखादे स्थान असेल की जिथे कित्येक साधूसत्पुरुष राहतात परंतु तिथे मंदिर मात्र एकही नाही तर त्या स्थानाला तीर्थच म्हणावे लागेल. आणि एखाद्या ठिकाणी शेकडो मंदिरे असतील, परंतु त्यातून कित्येक वाईट, अपवित्र लोक राहत असतील तर त्या स्थानाचा तीर्थपणा नाहीसा झालेला आहे असेच समजावे. परत, तीर्थस्थानी वास करणे फार अवघड आहे. कारण, इतर ठिकाणी केलेले पाप तीर्थस्थानी खंडते, परंतु तीर्थस्थानी केलेले पाप मात्र कुठेही आणि कशानेही खंडत नाही.

सगळ्याच्या सगळ्या उपासनांचा सारांश आहे – शुद्ध चित्ताचे बनणे आणि इतरांचे कल्याण करणे. गरीब, दुबळे, रोगी वगैरेंमधे ज्यांना शिव दिसतो, तेच खरेखुरे शिवाचे उपासक होत. तेच खरोखर शिवाची उपासना करीत असतात. आणि जो माणूस केवळ प्रतिमेमधेच शिवाची उपासना करीत असतो, त्याने धर्मजीवनाला नुकतीच सुरुवात केली आहे असे म्हणता येईल. फक्त मंदिरामधेच शिव आहे असे मानणाऱ्या व्यक्तीपेक्षा, जी व्यक्ती जात किंवा धर्म विचारात न घेता एखाद्या गरीब माणसाची शिवबोधाने सेवा करते, तिच्यावर शिव अधिक प्रसन्न होतात.

अनेक प्रसंगी, 'शिवभावे जीवसेवा' या विषयावर बोलताना स्वामीजी म्हणाले.

का बरे आपण जगावर उपकार करायचे? वरवर बघितल्यास वाटते की आपण जगावर उपकार करीत आहोत, पण वस्तुस्थिती मात्र अशी आहे की आपण वस्तूत: आपल्या स्वत:वरच उपकार करत असतो. ... मोठेपणाच्या तोऱ्यात येऊन, खिशातून दोन दमड्या काढून, 'हं, हे घे रे भिकारड्या' म्हणून एखाद्या गरिबाच्या अंगावर त्या फेकून देण्याचे कृत्य करू नका, तर उलट त्याच्याशी कृतज्ञतेचे वर्तन ठेवा. कारण तो गरीब असल्यामुळेच त्याला साहाय्य करून तुम्ही वस्तूत: स्वत:वरच उपकार करण्यास समर्थ होत आहात. लक्षात ठेवा की दानाने धन्य होत असतो देणारा, घेणारा नव्हे. जगावर आपल्या दयाशक्तीचा प्रयोग करण्यास वाव मिळून तुम्ही स्वत:ला

पवित्र व सिद्ध बनविण्यास समर्थ होऊ शकता याबद्दल तुम्ही कृतज्ञता बाळगली पाहिजे.

सर्व मांगल्याचा, सर्व नीतिमत्तेचा मूलमंत्र आहे 'मी नाही, तू' हाच. स्वर्ग-नरक आहेत की नाहीत याची कुणाला पंचाईत? असेल आत्मा, किंवा नसेल, कुणाला त्याची उठाठेव? न बदलणारी सत्ता आहे की नाही - काय अर्थ आहे या वादावादीत? हे समोर जग दिसते आहे. ते दु:खात खितपत आहे. बुद्धासारखे पुढे व्हा, ते दु:ख दूर करण्याचा प्रयत्न करा, नाहीतर त्या प्रयत्नात प्राण अर्पण करा. स्वत:ला विसरून जा. आधी हा धडा गिरवा. बाकीचे नंतर. मग तुम्ही आस्तिक असा की नास्तिक असा, अज्ञेयवादी असा की वेदान्ती असा, ख्रिश्चन असा की मुसलमान, त्याला काही हरकत नाही.

बुद्धदेवच फक्त असे एकमात्र महापुरुष होते की ज्यांचे म्हणणे होते - "मी तुमचा तो ईश्वरासंबंधीच्या सिद्धान्ताचा काथ्याकूट ऐकू इच्छित नाही. आत्म्यासंबंधीच्या या साऱ्या सूक्ष्म मतमतान्तराचा कीस काढण्यात खरोखर काय स्वारस्य? चांगले कर्म करा आणि चांगले व्हा. ... पैशाचा म्हणा, कीर्तीचा म्हणा की आणखी कशाचा म्हणा, कोणताच हेतू हृदयात न बाळगता जो कर्म करतो तोच खरोखर सर्वापेक्षा उत्तम रीतीने कर्म करत असतो.

सगळ्यापेक्षा मोठे पाप म्हणजे स्वार्थीपणा हे होय. स्वार्थीपणा म्हणजे आधी स्वत:चीच फिकीर करणे - आधी आपलाच विचार करणे. मी आधी खाईन, सगळ्यांपेक्षा जास्त श्रीमंत होईन, मीच सगळ्या धनाचा मालक होईन असे ज्याला वाटते; मी इतरांच्या आधी स्वर्गाला जाईन, मी इतरांच्या आधी मुक्ती मिळवीन असे ज्याला वाटते तो स्वार्थी होय. नि:स्वार्थी माणूस म्हणत असतो की मी सर्वांच्या आधी जाऊ इच्छीत नाही - जर माझ्या बांधवांना हात देण्यासाठी नरकात जावे लागेल तर त्यालाही माझी तयारी आहे. कुणी धार्मिक आहे की अधार्मिक आहे याची पारख करावयाची असल्यास बघावे की ती व्यक्ती कितपत नि:स्वार्थी आहे. जो अधिक नि:स्वार्थी तोच अधिक धार्मिक होय, तोच शिवाच्या अधिक जवळ असतो.

तुम्ही कोणालाही साहाय्य करू शकत नाही, तुम्ही केवळ सेवा करू शकता; ईश्वराच्या या लेकरांची सेवा करा; जर तुमचे सद्भाग्य असेल तर स्वयं ईश्वराची सेवा करा. ईश्वराच्या कृपेने जर त्याच्या एखाद्या संतानाला तुम्ही साहाय्य करू शकला तर तुम्ही स्वत:ला धन्य माना. स्वत:बद्दल अवास्तव कल्पना करून घेऊ नका. इतर कोणालाही न मिळता सेवा करण्याचा अधिकार तुम्हाला मिळाला, म्हणून तुम्ही धन्य आहात. केवळ 'पूजा' या भावनेने ही सेवा करा.

ईश्वराला मदत करण्याची नव्हे, तर ईश्वरासाठी काम करण्याची आपल्याला संधी मिळाली आहे याबद्दल आपण धन्यता मानायला हवी. 'मदत' हा शब्द तुम्ही आपल्या मनातून अगदी काढून टाका. तुम्ही ईश्वराला मदत करू शकत नाही. 'मी ईश्वराला मदत करतो' असे म्हणणेही ईश्वरनिंदा आहे. खरे म्हणजे तुम्ही येथे जे आहात ते त्याच्याच इच्छेने. तुम्हाला असे वाटते की तुम्ही त्याला मदत करता? नाही; त्याची पूजा करता. तुम्ही जेव्हा अन्नाचा एखादा घास एखाद्या कुत्र्याला देता तेव्हा तुम्ही कुत्र्याच्या रूपात ईश्वराची पूजा करीत असता. ईश्वर त्या कुत्र्यात आहे. ईश्वर हाच कुत्रा झाला आहे. तोच सर्वकाही झाला आहे. तोच सर्वांमधे वसत आहे.

ह्या नरकतुल्य जगात तुम्ही एखाद्या माणसाच्या चित्ताला एखाद्या दिवसापुरता तरी थोडासा आनंद आणि शांती ह्यांची प्राप्ती करून देऊ शकलात, तर तेच सत्य होय; माझ्या सबंध हयातीत दु:ख भोगून मी हेच शिकलो आहे; बाकी सगळे म्हणजे निव्वळ भ्रम होय.

सगळ्याच्या सगळ्या उपासनांचा सारांश आहे – शुद्ध चित्ताचे बनणे आणि इतरांचे कल्याण करणे. गरीब, दुबळे, रोगी वगैरेंमधे ज्यांना शिव दिसतो तेच खरेखुरे शिवाचे उपासक होत – तेच खरोखर शिवाची उपासना करीत असतात. आणि जो माणूस केवळ प्रतिमेमधेच शिवाची उपासना करीत असतो, त्याने धर्मजीवनाला नुकतीच सुरवात केली आहे असे म्हणता येईल.

'सज्जन माणसे इतरांसाठीच जगत असतात, सूज्ञाने इतरांसाठी आत्मयज्ञ

केला पाहिजे' हा एकमेव मार्ग आता जगात उरला आहे. मी जर तुमचे कल्याण केले तरच मी माझे हित साधू शकेन. दुसरा कोणताच मार्ग नाही, अगदी कोणताच नाही.

गावोगाव हिंडा आणि मानवाचे व एकंदर जगाचे कल्याण करा. दुसऱ्यांना मोक्ष मिळावा यासाठी स्वतः नरकात जाण्याची तयारी ठेवा. .... मृत्यू अटळ आहे, म्हणून सत्कार्यार्थ प्राणार्पण करणेच अधिक श्रेयस्कर आहे.

थोर लोकांनी महान त्याग करावा व सामान्यजनांनी त्याची फळे उपभोगावी या गोष्टीला साऱ्या जगाचा इतिहास साक्ष देईल. आपल्याच वैयक्तिक मुक्तिकामनेने तुम्ही जर सर्वस्वाचा त्याग केला तर तो कसला त्याग ? जगाच्या कल्याणासाठी स्वत:च्या मुक्तीवर देखील पाणी सोडण्याची तुमची तयारी आहे काय?

लाखो स्त्रीपुरुष पावित्र्याच्या अग्निमंत्राची दीक्षा घेऊन व ईश्वरावरील दृढ विश्वासाचे चिलखत धारण करून, गरीब, पतित व पददलित यांच्याविषयी असलेल्या सहानुभूतीतून प्रस्फुरित झालेल्या सिंहसदृश साहसाने समस्त भारतामधे विचरण करोत आणि मुक्ती, सेवा, समाजाची उन्नती आणि समता यांचा मंगलमय संदेश घरोघर पोहोचवोत.

अगोदर तुम्हाला तुमच्या खोलीची दारे सताड उघडावी लागतील. तुमच्या अवतीभवती दारिद्र्याने गांजलेले कितीतरी लोक मोठ्या कष्टाने जीवन जगत असतील. त्या साऱ्यांची तुम्हाला यथासाध्य सेवा करावी लागेल. जे रोगपीडित असतील त्यांच्या औषधपाण्याची व्यवस्था करून द्यावयाला हवी, आणि स्वतः जातीने खपून त्यांची सेवा करायला हवी. जे भुकेले असतील त्यांच्यासाठी अन्नपाण्याची व्यवस्था करायला हवी. तुम्ही इतके शिकला आहात. भोवतालच्या अडाणी, अशिक्षित लोकांना शक्य तितके तोंडीच शिकवण्याचा प्रयत्न करा. अशाप्रकारे दुसऱ्यांची सेवा करूनच तुम्हाला शांती मिळेल.

ईश्वरावर विश्वास असू द्या. कोणत्याही कूटनीतीचे काही प्रयोजन

नाही. कूटनीतीने, कपटाने, चलाखीने काहीही साधत नसते. दुःखितांसाठी तुमचे हृदय कळवळू द्या आणि साहाय्यासाठी भगवंतापाशी प्रार्थना करा, तुम्हाला साहाय्य मिळेलच मिळेल. ... या दूरच्या देशात उपासमारीने किवा भयंकर थंडीने कदाचित मला मरण येईल, पण माझ्या प्रिय तरुणांनो, मी तुमच्यासाठी गरीब, अज्ञानी आणि दलित यांच्याविषयी सहानुभूतीचा आणि त्यांच्या उन्नतीसाठी प्राण पणास लावून प्रयत्न करण्याचा वारसा ठेवून जात आहे. ... हे जे तीस कोटी भारतवासी दिवसेंदिवस खाली-खाली जात आहेत त्यांना वर आणण्यासाठी, त्यांचा उद्धार करण्यासाठी आपले सारे जीवन अर्पण करण्याची तुम्ही प्रतिज्ञा करा.

"इतकी सारी तपस्या आणि वैकल्ये केल्यानंतर मला जी सर्वोच्च जाणीव झाली ती हीच - साऱ्या वस्तूंमध्ये तोच ओतप्रोत भरलेला आहे. त्याचीच ही सारी दृश्य रुपे आहेत. ईश्वर अन्यत्र कुठे शोधायला नको. सर्व प्राणीमात्रांची जो सेवा करतो तो ईश्वराचीच सेवा करतो."

* * *

*मराठी सिनिअर (इयत्ता ८ ते १०)*

***विशेष सूचना :***

*१. प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.*

*२. कृपया विषयास धरून बोलावे.*

*३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे:*

*(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता: १० गुण (क) प्रभाव : १० गुण*

# १. श्री रामकृष्ण आणि त्यांचा जीवनोद्देश- स्वामी विवेकानंद

आमच्या देशात गुरु ही अत्यंत सन्मान्य व्यक्ती असते, त्यांना साक्षात् ईश्वर मानण्यात येते. गुरुइतका सन्मान आम्ही प्रत्यक्ष आपल्या जन्मदात्या मातापित्यांनादेखील देत नसतो. पितामाता आपल्याला फक्त हे शरीर देत असतात, पण गुरु हे चिरंतन मुक्तीचा मार्ग दाखवीत असतात. आपण त्यांचेच आत्मज - त्यांचे मानसपुत्र आहोत. कुठेही एखाद्या असाधारण सद्‌गुरुंचा उदय झाल्यास हिंदू लोक त्यांच्या दर्शनाच्या लाभासाठी धाव घेतात, लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्यांना घेरून बसतात.

माझे गुरूदेव, श्री रामकृष्ण परमहंसही एक असेच असामान्य लोकगुरु होते. परंतु लोक आपल्याला मान देतात की नाही इकडे त्यांचे मुळीच लक्ष नव्हते. आपण म्हणजे एक श्रेष्ठ आचार्य आहोत ह्याची त्यांना स्वत:ला जाणीवही नव्हती. त्यांना फक्त एवढेच ठाऊक होते की, आपली जगन्माताच सारे काही करीत आहे, आपण स्वत: काहीच करीत नाही. ते नेहमी म्हणत-"माझ्या तोंडून जर एखादी चांगली गोष्ट बाहेर पडत असेल तर ती माझ्या आईचीच, जगन्मातेचीच! माझा स्वत:चा मोठेपणा त्यात काय आहे?" स्वत:च्या प्रचारकार्यासंबंधी त्यांच्या चित्तात ही अशी धारणा सर्वदा वसत असे, आणि अगदी अखरेच्या क्षणापर्यंत ती त्यांना कधी सोडून गेली नाही.

सुधारकांची आणि टीकाकारांची कामाची पद्धत ही आम्ही बघितली

आहेच. हे लोक दुसऱ्यांचे दोष दाखविण्यातच गर्क. आहे ते सारे काही तोडून फोडून आपल्याच कल्पनेनुसार हे लोक सगळे नव्याने घडवू पाहतात. आपण सर्वचजण स्वत:ला आवडणारी एकेक कल्पना कवटाळून बसलो असतो. खेदाची गोष्टी हीच की, कुणीच तिला आचरणात आणावयास सिद्ध नसतो. कारण एकाप्रमाणे इतर सगळेही फक्त दुसऱ्यांना उपदेश देण्यासच तयार असतात.

माझ्या गुरुदेवांची पद्धत अगदी निराळी होती. ते कुणाला बोलवायला जात नसत. त्यांचा मुळी मूलमंत्रच हा होता की, प्रथम चारित्र्य बनवा, आधी आध्यात्मिकता कमवा, फळ मग आपोआप लाभेल. याविषयी त्यांचा एक अत्यंत आवडीचा दृष्टान्त होता "कमळ फुलले की मग भुंग्यांना काही आमंत्रण द्यावे लागत नाही, मधु शोधीत ते आपोआपच तिथे येतील. त्याचप्रमाणे तुमचे हृदयपद्म पूर्ण प्रस्फुटित होताच हजारो लोक तुमच्याजवळ उपदेशासाठी येऊ लागतील. कुणाला बोलवायला जावे लागणार नाही." आपण आपल्या आयुष्यात गिरविण्यास योग्य असा हा एक अत्यंत महत्त्वाचा धडा आहे. माझ्या गुरुदेवांनी मला तो हजारदा शिकविला असेल, पण तरीही मी तो वारंवार विसरतोच.

विचारांची शक्ती किती अद्भुत आहे याची जाणीव फार थोड्या लोकांना असते. कुणी जर एखाद्या गुहेत जाऊन तिचे दार बंद करून टाकून स्वत:ला कोंडून घेईल, आणि एखादाच खराखुरा महान विचार करीत करीत तिथे प्राण सोडील तर तो विचार त्या गुहेच्या भिंती भेदून बाहेर पडेल आणि आकाशातून संचार करीत अखेर समस्त मानवजातीच्या हृदयात संक्रमित होईल. विचाराची शक्ती अशी विलक्षण आहे. म्हणून आपले विचार इतरांना देण्याची घाई करू नका, त्यासाठी उतावीळ होऊ नका. आधी नीट संचय होऊ द्या, देण्यासारखे काही जमू द्या. ज्याच्याजवळ देण्यासारखे काही आहे तोच खरा उपदेश देऊ शकतो.

आधी शील बनवा, चारित्र्य घडवा. तेच तुमचे आद्य आणि श्रेष्ठ कर्तव्य होय. आधी सत्य काय ते स्वत: जाणून घ्या, नंतर मग अनेकजण

तुमच्याजवळून ते शिकतील–ते सारे आपण होऊन तुमच्याकडे ओढले जातील. माझ्या गुरुदेवांची वृत्ती अशीच होती. ते कुणावरही टीका करीत नसत. वर्षांनुवर्ष मी अहोरात्र त्यांच्या सहवासात राहिलो आहे, पण त्यांच्या जिव्हेने कोणत्याही संप्रदायासंबंधी एकदेखील निंदाजनक शब्द एकदाही कधी उच्चारलेला मी ऐकला नाही. सर्व संप्रदायाविषयी त्यांना सारखीच सहानुभूती वाटत होती, कारण त्यांना त्या सर्वांमधील समन्वयाचे दर्शन घडले होते.

माणूस ज्ञानप्रवण, भक्तिप्रवण, योगप्रवण किंवा कर्मप्रवण असतो. भिन्न भिन्न धर्मांत यातीलच कोणत्या ना कोणत्या तरी एका भावाचे प्राधान्य असल्याचे आढळून येते. तथापि एकाच व्यक्तीत ह्या चारही भावांचा विकास संभवनीय आहे, आणि भावी मानव तो करून दाखविण्यास समर्थ होईल अशीच त्यांची धारणा होती. असे असल्यामुळे ते कुणाचाही दोष बघत नसत, साऱ्यांतील चांगलेच पाहण्याचा त्यांचा स्वभाव होता.

आता ह्या अद्भुत पुरुषश्रेष्ठाच्या दर्शनासाठी आणि त्यांच्या त्या सरल, ग्रामीण भाषेत त्यांचा अमृतमधुर, अपूर्व उपदेश ऐकण्यासाठी लोकांच्या झुंडीच्या झुंडो येऊन धडकू लागल्या. ते जे काही बोलत त्यातील प्रत्येक शब्द कसा शक्तीने स्पंदत असे, प्रत्येक वाक्य ऐकणाऱ्याच्या हृदयातील अज्ञानतमाचा ध्वंस करून टाकीत असे. भाषणात वस्तुत: काही नाही, अन् भाषेत तरी काय आहे? बोलणाऱ्याचे व्यक्तिमत्त्व त्याच्या शब्दा–शब्दातून प्रकट होत असते–त्याच्या शब्दांत जो जोर असतो तो त्यामुळे.

आपल्याला सर्वांनाच कधीकधी याचा अनुभव येत असतो. विलक्षण वक्तृत्वाचा खूप गडगडाट ऐकून अगदी चकित होऊन गेलो, तर्कांच्या अद्भुत कोलांट्या बघून थक्क झालो. सारे ऐकून घरी परत आलो. फळ? फळ – नळी फुंकिली सोनारे, इकडुनी, तिकडे गेले वारे! फिरून कोरे चक्क! तेच, दुसऱ्या एखाद्या वेळी कदाचित अगदी साध्यासुध्या भाषेत चारदोनच शब्द कानावर पडले असतील. पण परिणाम? ते कसे हृदयाचा ठाव घेतात, उभ्या आयुष्यभर आपल्या जीवन–वीणेवर झंकारत राहतात.

आपले अंगच बनून चिरस्थायी फल प्रसवितात.

माझा भाग्योदय होऊन मला श्रीरामकृष्णांचे दर्शन घडले. त्यांच्याविषयी ऐकून मी त्यांचा उपदेश श्रवण करण्यासाठी गेलो. दिसायला ते एखाद्या साधारण माणसाप्रमाणे दिसले, त्यांच्यात बाहेरून असाधारणत्व असे काही आढळले नाही. अगदी सरळ, सोप्या भाषेत ते बोलत होते. मी स्वत:शीच म्हणू लागलो की, ही व्यक्ती एक मोठा धर्माचार्य असणे कसे बरे शक्य आहे? ते कसेही असो, मी पुढे सरकलो आणि अमळ जवळ जाऊन, आपल्या आयुष्यभर जो प्रश्न मी इतरांना विचारीत आलो होतो तोच त्यांनाही विचारला. मी विचारले, "महाराज, आपण ईश्वराला पाहिले आहे काय?" त्यांनी तात्काळ असंदिग्ध उत्तर दिले, "होय", "महाराज, आपण त्याच्या अस्तित्वासंबंधी काही प्रमाण देऊ शकाल काय?" "होय" "ते प्रमाण कोणते?" "प्रमाण? प्रमाण हेच की, मी तुला जसा आपल्यासमोर बघतो आहे, त्यालाही अगदी तसाच बघत आहे. फक्त आणखीच स्पष्ट–अधिक उज्ज्वलपणे, अधिक उत्कटपणे, इतकेच!" ऐकून मी तर अगदी मुग्ध होऊन गेलो. त्यांच्या उत्तराने एकदम माझ्या हृदयाचा ठाव घेतला. आज अगदी प्रथम मी असा एक माणूस बघत होतो की, 'मी ईश्वर पाहिला आहे' असे तो छातीठोकपणे सांगत होता.

मी मग दिवसांमागून दिवस रोज त्यांचेकडे जाऊ लागलो. तो समग्र वृत्तान्त येथे तुम्हाला सांगणे अर्थातच शक्य नाही. तथापि थोडक्यात एवढे मात्र सांगू इच्छितो की, धर्म खरोखरच दुसऱ्याला 'देता' येऊ शकतो हे मी स्वत: प्रत्यक्ष बघितले आहे. नुसत्या स्पर्शाने, केवळ एका दृष्टिपाताने अवघे जीवन बदलू शकते. मी असली घटना वारंवार घडताना पाहिली आहे– आपल्या ह्या डोळ्यांनी पाहिली आहे.

बुद्ध, ख्रिस्त, महंमद आदी अनेक प्राचीन महापुरुषांविषयी मी वाचले होते की, ते एखाद्याला उद्देशून म्हणत की, 'तू बरा हो' आणि ती व्यक्ती खडखडीत बरी होऊन जाई. मला आता दिसून आले, माझी खात्री पटली की ते सर्व खरे आहे. ह्या व्यक्तीला पाहिल्यानंतर माझे

सगळे संदेह पार कुठल्या कुठे विरून गेले.

धर्म म्हणजे शब्दपांडित्य नव्हे. विभिन्न वाद किंवा मते यांतही धर्म साठविलेला नाही. अंध पंथाभिमान म्हणजेही धर्म नव्हे. धर्म हा संप्रदायांमध्ये किंवा पंथांमध्ये साठविलेला नसतो. धर्म म्हणजे आत्मा व परमात्मा यांमधील संबंध. धर्म हा संप्रदायांमध्ये किंवा पंथांमध्ये कसा बरे साठवून ठेवता येईल? तसे करू गेल्यास त्याला दुकानदारीचे स्वरूप येईल आणि धर्मात दुकानदारी शिरली, देवघेवीच्या व्यापारी तत्त्वांनी त्यात प्रवेश केला की त्यातील आध्यात्मिकतेचे दिवाळे निघालेच म्हणून समजा.

आपल्या आचार्यदेवांपासून मी आणखी एक महत्त्वाची गोष्ट शिकलो आहे. मला तर तीच सर्वात महत्त्वाची आणि आपल्या दृष्टीने विशेष आवश्यक वाटते ती म्हणजे हेच अद्भुत सत्य की, जगातील धर्म परस्परविरोधी नाहीत. ते सर्व केवळ एका शाश्वत 'धर्मा' चीच, त्या अनादी अनंत चिरंतन सत्याची भिन्न भिन्न रूपे आहेत. तो एक 'धर्म' च भिन्न भिन्न स्तरांवरील व्यक्तींच्या उपयोगी पडण्यासाठी, विभित्र व्यक्तींच्या व विभिन्न जातींच्या रुचिभेदानुसार त्यांच्या उपयोगी पडण्यासाठी नाना धर्माच्या रूपांनी प्रकट होत असतो.

'माझा' धर्म, 'तुझा' धर्म अथवा 'माझा' राष्ट्रीय धर्म, 'तुझा' राष्ट्रीय धर्म नावाची गोष्टच वस्तुतः अस्तित्वात नाही. अनेक धर्म वस्तुतः कधी अस्तित्वातच नव्हते, सदा विद्यमान आहे एकच 'धर्म'–ते एकमेवाद्वितीय सत्य. तोच एक अनंत, 'धर्म' अनादिकाळापासून विद्यमान आहे आणि चिरकाल तसाच राहीलही. आणि तोच 'धर्म' निरनिराळ्या देशांत वेगवेगळ्या तऱ्हांनी प्रकट होत असतो. अतएव आपण सर्वच धर्मांविषयी आदर बाळगला पाहिजे, आणि त्या सर्वांचेच सत्य म्हणून ग्रहण करण्याचा शक्य तितका यत्न केला पाहिजे.

'धर्म' केवळ विभिन्न जातींनुसार आणि विभिन्न देशांनुसारच भिन्न भिन्न धर्मांच्या रूपात प्रकट होतो असे नाही तर, व्यक्तीव्यक्तीच्या

पात्रतेनुसारही तो निरनिराळी रूपे धारण करीत असतो. कुण्या एखाद्या व्यक्तीत 'धर्म' प्रबल कर्मशीलतेच्या रूपाने प्रकटतो, तर कुणात प्रगाढ भक्तीच्या रूपाने, कुणात तो योगाच्या रूपाने प्रकटतो, तर आणखी एखाद्यात ज्ञानाच्या रूपाने.

कुणाचाही विश्वास नष्ट होईल असे काहीही करू नका. तुम्हाला शक्य असेल तर त्याला अधिक चांगले काहीतरी द्या. तुम्हाला शक्य असेल तर माणूस जिथे उभा आहे तिथून त्याला अमळ वर सरकवा. जमल्यास असे करा, परंतु त्याच्याजवळ जे काय आहे त्याचा नाश मात्र करू नका. जो स्वत:ला एका क्षणात जणू हजारो विभिन्न व्यक्तीत परिवर्तित करू शकतो, तोच खरोखर यथार्थ गुरू होय. आपल्या शिष्याच्या अवस्थेपर्यंत अगदी सहजगत्या उतरू शकून जो त्याच्या भूमिकेशी झटकन समरस होऊ शकतो, तोच खराखरा आचार्य वा गुरू होय. आपल्या निषेधात्मक, मोडतोडीच्या, विध्वंसक पद्धतीच्या शिकविण्याने जे केवळ दुसऱ्यांचा विश्वास अथवा भाव भंगून टाकण्यातच दंग असतात त्यांच्या हातून कधीच कुणाचे हित घडत नसते.

माझ्या आचार्यदेवांच्या सान्निध्यात राहिल्याने मला कळून आले की, माणूस ह्या देहातच सिद्धावस्था प्राप्त करून घेऊ शकतो. त्यांच्या मुखातून शापवाणी कधीच बाहेर पडली नाही, फार काय पण त्यांनी कधी कुणावर टीकादेखील केली नाही. जगात कुठे अशुभ बघण्याची शक्तीच त्यांच्या दृष्टीतून नाहीशी झाली होती, अपवित्र विचार करण्यास त्यांचे मन संपूर्ण असमर्थच बनून गेले होते. त्यांना सर्वत्र शुभाव्यतिरिक्त आणखी काहीच दिसत नव्हते. अशी महापवित्रता, असला महात्यागच धर्मलाभाचा एकमात्र गुह्य उपाय होय.

वेद म्हणतात, "न धनेन, न प्रजया, त्यागेन एके अमृतत्वम् आनशु:" "धनाच्या वा पुत्राच्या द्वारा नव्हे तर एकमात्र त्यागाच्या द्वाराच मुक्तिलाभ होत असतो." येशू ख्रिस्तांनी म्हटले आहे. "तुमच्यापाशी जे काही असेल ते सर्व विकून आपले सर्वस्व गरिबांना देऊन टाका आणि माझे

अनुसरण करा." सर्व थोरथोर आचार्यांनी व महापुरुषांनीही हेच सांगितले आहे. आणि स्वत:च्या जीवनात प्रत्यक्ष आचरून दाखविले आहे. अशा त्यागाखेरीज आध्यात्मिकता कशी बरे उत्पन्न होऊ शकेल? कुठलाही आणि कोणताही धर्म घ्या, प्रत्येक धर्माचा आधार हा त्यागच आहे. आणि तुम्हाला आढळून येईल की, ह्या त्यागाच्या भावनेला जसजशी ओहोटी लागेल तसतशी धर्मात इंद्रियपरायणतेला भरती येत राहील, आणि त्याच प्रमाणात आध्यात्मिकेतेलाही उतरती कळा लागेल.

ही व्यक्ती मूर्तिमंत त्यागच होती. आमच्या देशात जे संन्यास घेतात त्यांना समस्त धन-ऐश्वर्य, मान-सन्मान इत्यादींचा त्याग करावा लागतो. माझ्या गुरुदेवांनी या आदेशाचे अगदी अक्षरन्अक्षर आपल्या जीवनात मूर्तत्वास आणले. ते कांचनाला शिवत नसत. कांचनत्यागाच्या व्रताने त्यांच्यावर असा काही विलक्षण प्रभाव पाडला होता की, फार काय पण निद्रितावस्थेतदेखील त्यांच्या देहाला धातूचा स्पर्श केल्यास त्यांचे अवयव संकुचित होऊन जात. गुरुदेवांनी अल्पस्वल्पही काही ग्रहण केल्यास स्वत:ला कृतार्थ मानणारे कितीतरी लोक असत, मोठ्या आनंदाने त्यांनी ह्यांच्यावरून हजारो रुपये ओवळून टाकले असते. परंतु माझ्या गुरुदेवांचे उदार हृदय सर्वांनाच आलिंगन देण्यासाठी सदैव तयार असूनही या असल्या लोकांशी ते फटकूनच वागत. काम-कांचनावरील संपूर्ण विजयाचे ते एक जिवंत आणि दैदिप्यमान उदाहरण होते. या दोन्ही तृष्णांचा त्यांचे ठायी गंधदेखील नव्हता. आणि ह्या शतकात असल्याच विभूतींची अत्यंत आवश्यकता आहे.

आजकाल आपण ज्यांना 'गरजेच्या वस्तू' म्हणतो त्यांच्याखेरीज आपण महिनाभर देखील जिवंतच कसे राहू याची आपल्याला विवंचना पडते, आणि ह्या गरजांना प्रमाणबाहेर, अगदी बेसुमार वाढविण्यासाठी जणू आपण कंबरच बांधली आहे. आणि म्हणूनच आज असल्या त्यागाची आत्यंतिक आवश्यकता आहे. जगातल्या अवघ्या धनाची आणि कीर्तीची काडीमात्रही पर्वा करीत नाही असा माणूस आजही ह्या भूतलावर वास

करीत आहे, हे अलम दुनियेतील साऱ्या अविश्वासी लोकांना सप्रमाण, सोदाहरण पटवून देण्यासाठी उभा होईल अशा माणसाची आजच्यासारख्या काळात फारच जरूर आहे. सुदैवाने अद्याप अशी माणसे विद्यमान आहेत.

माझ्या गुरुदेवांच्या जीवनाचा आणखी एक विशेष म्हणजे त्यांचे विश्वप्रेम. त्यांच्या जीवनाचा पूर्वार्ध धर्माच्या उपार्जनात आणि बाकी उत्तरार्ध त्याच्या वितरणात खर्च झाला.

दर्शनेच्छुंच्या झुंडीवर झुंडी त्यांच्या वचनामृताचे पान करावयास मिळावे म्हणून त्यांच्या चरणी लोटत, आणि तेही दिवसातून वीस वीस तास त्यांच्याशी संभाषण करून त्यांची मन:कामना पुरवीत. आणि हा प्रकार एक दिवस नव्हे की दोन दिवस नव्हे, अविरत महिन्यामागून महिने चालला होता. येथवर की, अखेरीस असल्या कठोर परिश्रमाच्या ताणामुळे त्यांची प्रकृती जी ढासळली ती कायमचीच. मानवजातीवर त्यांचे असे काही अगाध प्रेम होते की, त्यांच्याकडे कृपालाभार्थ येणाऱ्या सहस्रावधी लोकांतील अति सामान्य व्यक्तीही त्यांच्या कृपेच्या लाभापासून कधी वंचित झाली असे घडले नाही.

हळूहळू गुरुदेवांच्या घशात घातक फोड उठल्याचे दिसून आले. पण तरीदेखील त्यांनी बोलण्याचे सोडले नाही. आम्ही नेहमीच त्यांचेजवळ राहत असू. त्यांना त्रास न व्हावा याकरता, ते जेणेकरून लोकांची भेट घेणार नाहीत असा आम्ही प्रयत्न करू लागलो. परंतु आपल्याला भेटावयास कुणी आला आहे अशी कुणकुण लागण्याचाच 'अवकाश, ते लगेच त्याला आपल्याजवळ घेऊन येण्याचा हट्ट धरीत, आणि तो दर्शनेच्छू येताच त्याच्या एकूणएक सर्व प्रश्नांचे समाधानपूर्वक निरसन करीत. लोकांशी इतके बोलून बोलून फार त्रास होईल या सबबीवर प्रेमाने रागे भरून त्यांच्या ह्या परिपाठात अडथळा आणण्याचा कुणी प्रयत्न केल्यास अमळ हसून उत्तरादाखल ते फक्त इतकेच म्हणत, "काय? देहाला त्रास? त्यात काय झाले एवढे? हा देह जर कुणाच्या सेवेत खर्ची पडेल तर सत्कारणीच लागेल. एकाजणाचेही जरी यथार्थ कल्याण होत असेल तरी

अशा शेकडो, हजारो देहांचे लिंबलोण उतरून टाकण्यास मी आनंदाने तयार आहे. एखाद्याच्याही उपयोगी पडण्यात केवढी तरी धन्यता आहे." एकूण, विश्रांतीला ते पुरेपूर पारखे झाले होते.

एकदा एकजण त्यांना म्हणाला, "महाराज, आपण केवढे थोर योगी आहात, आपण आपले मन देहावर किंचित एकाग्र करून आपला रोग बरा का करून टाकीत नाही?" पहिल्यांदा तर त्यांनी यावर काही उत्तरच दिले नाही. पण त्या व्यक्तीने तो प्रश्न फिरून विचारताच ते मृदू स्वरात म्हणाले, "मी तुम्हाला ज्ञानी समजत होतो, पण तुम्ही तर इतर साधारण संसारी माणसांप्रमाणे बोलत आहात. हे मन भगवंताच्या पादपद्मी अर्पण केले आहे. ते तेथून काढून परत ह्या कुडीवर लावावे असे का तुमचे म्हणणे आहे? ह्या देहाची मातब्बरी ती काय? हाडांचा सापळा नुसता – आत्म्याचा पिंजरा. छि: !"

आज भगवान श्रीरामकृष्णांचे नाव समस्त भारतातील लक्षावधी, कोट्यवधी लोकांना सुपरिचित आहे. इतकेच नव्हे, तर त्यांची शक्ती एव्हानाच भारताबाहेरही विस्तार पावली आहे. आणि, ह्या पृथ्वीच्या पाठीवर मी कुठेही जरी सत्यासंबंधी, धर्मासंबंधी एखादा देखील शब्द उच्चारला असेल तर तो माझ्या गुरुदेवांचा आहे – त्यातील चुका फक्त माझ्या स्वत:च्या आहेत.

अतएव मानवजातीला माझ्या गुरुदेवांचा संदेश हाच आहे की – "प्रथम स्वत: धार्मिक व्हा व सत्याची उपलब्धी करून घ्या." आणि सर्वच देशांतील दृढ व बलवान तरुणांना संबोधून ते म्हणताहेत – "तुमचा त्यागाचा समय आला आहे." ते इच्छितात की स्वत:च्या भावासारख्या असलेल्या ह्या समस्त मानवजातीच्या कल्याणासाठी तुम्ही सर्वस्वाचा त्याग करा. त्यांचा आदेश आहे की, तुम्ही केवळ तोंडाने 'मी आपल्या बांधवांवर प्रेम करतो' असे घोकत न बसता आपले शब्द खरे करून दाखविण्यासाठी प्रत्यक्ष कामाला लागा. तरुणांना आवाहन करून ते हेच म्हणत आहेत "नि:संकोचपणे, नि:संदेहपणे झेप घ्या, स्वत: त्यागी बनून

जगाचा उद्धार करा."

आज गरज आहे त्यागाची, प्रत्यक्षानुभूतीची. अशी प्रत्यक्ष अनुभूती लाभल्यावर मग, जगातील सर्व भिन्न भिन्न धर्मामधे एकता आहे, समन्वय आहे हे तुम्हाला स्पष्ट दिसून येईल. तुम्हाला मग कळून येईल की परस्पर कलहाचे काहीच कारण नाही. आणि तेव्हाच तुम्ही अखिल मानवजातीची सेवा करण्यास समर्थ होऊ शकाल. सर्व धर्मामधे जे मूलभूत ऐक्य विद्यमान आहे ते स्पष्टपणे दाखवून देऊन त्याची घोषणा करणे हाच माझ्या आचार्यदेवांच्या जीवनाचा उद्देश होता. इतर आचार्यांनी विशिष्ट विशिष्ट धर्माचा प्रचार केला, ते धर्म त्यांच्या त्यांच्या नावांनी परिचित आहेत. परंतु एकोणिसाव्या शतकात आविर्भूत झालेल्या ह्या आचार्यप्रवराने कशावरच स्वत:चा हक्क सांगितला नाही. त्यांनी कोणत्याही धर्मावर कोणत्याच प्रकारचे आक्रमण केले नाही. कारण, त्यांना पुरेपूर उमजले होते, यथार्थ उपलब्धी झाली होती की, ते सर्वच धर्म त्या एकमेवाद्वितीय सत्याची, त्या एका ‘धर्मा’चीच केवळ अंगप्रत्यंगे होत.

* * *

***मराठी सिनिअर (इयत्ता ८ ते १०)***

***विशेष सूचना :***

*१. प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.*

*२. कृपया विषयास धरून बोलावे.*

*३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे:*

*(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता: १० गुण (क) प्रभाव : १० गुण*

# २. स्वामी विवेकानंदांचे पूर्वेमधील प्रथम व्याख्यान

असा समय होता, की जेव्हा बलाढ्य ग्रीक सेनेच्या वीर्यदर्पाने सारी पृथ्वी चळचळा कापत असे. आज ग्रीक कुठे आहेत? ते नामशेष झालेत– आज त्यांचे चिन्हसुद्धा उरलेले नाही. ग्रीसदेशाचा गौरवरवी आज अस्तंगत झालेला आहे! असा काळ होता की जेव्हा रोमच्या गरुडांकित विजयपताकेची सावली जगातील समस्त वांच्छनीय भोग्य वस्तूंवर पडलेली होती. रोमन सर्वत्र संचार करीत होते– मानवजातीवर सर्वत्र आपला अंमल बसवीत होते. रोमच्या नावाने धरणी थरथर कापत असे. आज कॅपिटोलाईन पहाड केवळ एक भग्न अवशेषांचा ढीग होऊन पडला आहे! ज्या ठिकाणी प्रचंडप्रतापी सीझर राजे आपल्या अमित बलाने राज्य करीत असत, तिथे, त्या ठिकाणी आज कोळी इतस्तत: आपली जाळी करताना दिसतात! जगात अशाच इतरही अनेक जाती उदयास आल्या आहेत आणि लयास गेल्या आहेत– मदोन्मत्त होऊन, गर्वाने उद्दाम बनून सत्ता गाजवीत, इतरांना पीडा देत क्षणभंगुर जिणे जगून पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणे त्या स्मृतिशेष झाल्या आहेत. ह्या सर्व जाती या अशा तऱ्हेने मानवसमाजावर एकदा आपली चिन्हे रेखाटून आता अंतर्धान पावल्या आहेत–कायमच्या लुप्त होऊन गेल्या आहेत. पण आपण मात्र अजूनही जिवंत आहोत.

जगाच्या इतरही भागात निरनिराळया सभ्यता उदयास आल्यात. खरे

आहे. प्राचीन काळी आणि वर्तमान काळीही कित्येक शक्तीशाली, महान जातींनी उच्च विचार, उच्च सिद्धान्त, उच्च मते जगाला दिलीत. अगदी खरी गोष्ट. प्राचीन काळी आणि वर्तमान काळी कितीतरी अद्भुत तत्त्वे एका जातीने दुसऱ्या जातीला बहाल केली आहेत. मंजूर आहे. प्राचीन आणि वर्तमान काळी कुण्याकुण्या जातीच्या जीवनाच्या लोंढ्याबरोबर महान शक्तीशाली सत्यांची बीजे इतस्तत: विखुरली गेली आहेत. कबूल आहे. पण माझ्या मित्रांनो, लक्षात ठेवा. – त्या साऱ्यांचा प्रचार झाला आहे रणशिंगांच्या कर्कश निनादाने–रणसाज चढविलेल्या बेगुमान सैनिकांच्या धुमाळीमधून मानवी रक्तात भिजविल्याशिवाय, लाखो बांधवांचे रक्त सांडल्याशिवाय ह्यातील कोणतीही जात दुसऱ्या जातीला असला नवीन विचार वा सिद्धान्त देऊ शकलेली नाही. यातील प्रत्येक ओजस्वी सिद्धान्ताच्या प्रचाराबरोबरच उठले आहेत लाखोगणती निरपराध लोकांचे हाहाकार, उसळले आहेत अनाथ बालकांचे चीत्कार, वाहिले आहेत दीन विधवांचे अश्रू. मुख्यत: ह्याच उपायांनी इतर जातींनी जगाला शिकविले आहे. परंतु भारत या उपायांची कास न धरताही हजारो वर्षे जिवंत आहे.

जेव्हा ग्रीस अस्तित्वातदेखील नव्हता, रोम अजून जन्मास यावयाचे होते, ज्या वेळी आधुनिक युरोपियनांचे पूर्वज जर्मनीच्या घनदाट जंगलात असभ्य दशेत खितपत निळया रंगाने आपली अंगे रंगवीत असत तेव्हाही– त्या काळीही भारत क्रियाशील होता ह्याचा अमोघ पुरावा आहे. याहीपेक्षा प्राचीन कालापासून इतिहासाला ज्या काळाची काही माहिती नाही, दंतकथाही ज्या काळाच्या घनदाट अंध:काराचा भेद करू शकत नाहीत, त्या अति प्राचीन कालापासून वर्तमान कालापर्यंत कल्पनामागून कल्पना, सिद्धान्तांमागून सिद्धान्त, विचारांमागून विचार या भारतातून बाहेर गेले आहेत. परंतु त्या सर्वांच्या–त्यातील प्रत्येकाच्या पुढे शांती आणि मागे आशीर्वाणी होती. समोर शांती आणि पाठीशी आशीर्वाणी घेऊनच ते आपल्या जन्मभूमीतून बाहेर पडून इतर देशात, इतर जातीत गेले आहेत. जगातल्या सगळया जातींमध्ये फक्त आम्हीच कधीही इतर कोणत्याही

जातीशी युद्ध करून त्यांना जिंकले नाही. आणि त्या शुभ कर्माचे, त्या पुण्याचे फळ म्हणून आम्ही अजूनही जिवंत आहोत.

हजारो वर्षे चिंतन आणि पारख करून निर्मिले गेलेले ते सर्व पुरातन विधि-निषेध, ते सर्व प्राचीन नियम येथे अजूनही प्रचारात आहेत; शेकडो शतकांच्या अनुभवांनी अस्तित्वात आणलेले, चिरंतनच वाटावेत असे ते सगळे आचार येथे अजूनही प्रचारात आहेत. जसजसा काळ लोटत आहे, जितके जितके संकटाचे नि दुर्दैवाचे घणाघात त्यांच्यावर होत आहेत तसतसे नि तितके तितके ते आणखीच बळकट, अधिकाधिक चिरस्थायी, आणखीच टिकाऊ बनत आहेत. या सर्व विधि-निषेधांचे आणि आचारांचे केंद्र कोणते, कुठून जीवनरसाचा पुरवठा होऊन ते पोसले जात आहेत, आमच्या जातीच्या जीवनाचा मूळ झरा कोणता हे जर जाणू इच्छीत असाल तर विश्वास ठेवा-ह्या सर्व पृच्छांचे उत्तर आहे-धर्म. सारे जग पालथे घालून मला जो काय अनुभव लाभला त्याच्याच बळावर मी हा सिद्धांत बांधला आहे.

इतर जातींच्या लेखी धर्म हा संसारातील बाकीच्या कामांसारखे एक काम आहे, इतकेच. राजकरणाची चर्चा आहे, सामाजिक जीवन आहे, धन आणि सत्ता यांच्या द्वारा जे काही लाभू शकते, इंद्रियांना ज्याने आनंद होतो त्या साऱ्यासाठी धडपड आहे. या सगळया निरनिराळ्या कामांमधे, आणि भोग भोगून शिथिल झालेल्या इंद्रियांना अमळ उद्दीपित करण्याच्या खटाटोपाबरोबरच थोडाबहुत धर्मही आचारायचा-ही त्या लोकांची धर्माविषयी कल्पना. परंतु इथे, या भारतात मात्र माणसाचे सगळे प्रयत्न आहेत धर्मासाठी-धर्मलाभच त्याच्या जीवनातील एकमेव कार्य होय.

प्रत्येक व्यक्तीचेच काही ना काही विशेषत्व असते. प्रत्येकजण आपापल्या मार्गाने उन्नतीकडे जात असतो. आम्हा भारतीयांच्या अगणित पूर्वजन्मांमधील कर्मांच्या अनुरोधाने माणसाचे चालू जीवन एका विशिष्ट,

एका ठराविक मार्गाने जात असते. कारण, अनंत गतकर्मांनीच आमच्या जीवनाला हा आजचा घाट दिलेला आहे, आणि आम्ही आता जसे वागू त्यावरच आमच्या भावी जीवनाची घडण अवलंबून राहील. असे आहे म्हणूनच आढळून येते की या पृथ्वीच्या पाठीवर जन्मलेल्या प्रत्येक व्यक्तीचा एका ना एका गोष्टीकडे विशेष कल असतो, त्या विशिष्ट मार्गानेच जाणे जणू तिला भाग असते. त्या स्वतःच्या जन्मसिद्ध प्रवृत्तीचा आसरा घेतल्याखेरीज ती जगूच शकणार नाही. हे जसे एका व्यक्तीच्या बाबतीत खरे आहे, तसेच, व्यक्तींची समष्टी जी जात, तिच्या बाबतीतही ते तितकेच खरे आहे.

प्रत्येक जातीचाच जणू एक विशिष्ट जीवनोद्देश असतो. प्रत्येक जातीलाच जणू समस्त मानवजातीचे जीवन सर्वांगसंपूर्ण करण्यासाठी कोणत्यातरी एखाद्या विशिष्ट व्रताचे पालन करावे लागत असते. आपला स्वतःचा जीवनोद्देश प्रत्यक्षात उतरवून प्रत्येक जातीला अखिल मानवजातीबाबतच्या त्या स्वतःच्या व्रताचे उद्यापन करावे लागत असते.

राजनैतिक वा सामाजिक श्रेष्ठता हा कदापि आमच्या जातीचा जीवनोद्देश नव्हे. तो आमचा जीवनोद्देश कधीही नव्हता आणि लक्षात ठेवा, कधी होणारही नाही. आमच्या जातीचा एक निराळाच जीवनोद्देश आहे. आणि तो हाच–समस्त जातीची आध्यात्मिक शक्ती एकत्रीभूत करून जणू एका विद्युत–आधारात संरक्षित करणे, आणि जेव्हा म्हणून सुयोग येईल तेव्हा त्या समष्टिभूत शक्तीच्या लोंढ्याने सारे जग भरून टाकणे. जेव्हा म्हणून पारसी, ग्रीक, रोमन, अरब व इंग्रज जातींनी आपल्या दुर्जय सेनेसहित दिग्विजयार्थ बाहेर पडून निरनिराळ्या जातींना एका सूत्रात गोवले आहे–वेगवेगळया जातींचा एकमेकांशी संपर्क प्रस्थापित केला आहे. तेव्हा तेव्हा भारताचे तत्त्वज्ञान आणि भारताची अध्यात्मविद्या त्या साऱ्या नव्या मार्गांनी जगातील भिन्नभिन्न जातींच्या जीवनात भिनली आहे. अखिल मानवजातीच्या उन्नतिप्रीत्यर्थ शांतिप्रिय भारतीयांनाही काही

द्यावयाचे आहे. आध्यात्मिक दीप्तीच जगताला भारताचं योगदान होय.

यांप्रमाणे गतकाळाचा इतिहास चाळल्यास आपल्याला आढळून येते की जेव्हा जेव्हा कुण्या एखाद्या प्रबळ, दिग्विजयी जातीने पृथ्वीवरील निरनिराळ्या जातींना एका सूत्रांत गुंफले आहे – भारताचे इतर देशांशी, इतर जातींशी मीलन घडवून आणले आहे, चिरएकान्तप्रिय भारताचा एकान्त भंगून टाकला आहे, जेव्हा जेव्हा असला प्रकार घडून आला आहे, तेव्हा तेव्हा समस्त जग भारताच्या आध्यात्मिक प्रवाहाने तुडुंब भरून जाणे हाच त्याचा परिणाम झालेला आहे.

ज्यांचे डोळे उघडे आहेत, जे पाश्चिमात्य जगातील भिन्नभिन्न जातींची मने कशा प्रकारे कार्य करीत आहेत हे जाणतात, जे विचारशील आहेत आणि विभिन्न जातींच्या जीवनाचा ज्यांनी सखोल अभ्यास केला आहे त्यांना, भारतीय विचारांचा हा संथ, अविराम प्रवाह जगाच्या मनोभावात, वागणुकीत आणि साहित्यात किती विलक्षण परिवर्तन घडवून आणीत आहे हे स्पष्ट दिसून येईल. तथापि भारताच्या प्रचाराचे एक वैशिष्टय आहे. त्याची थोडीशी कल्पना मी तुम्हाला मगाशी दिलीच आहे. आम्ही कधीही बंदुकीच्या वा तलवारीच्या साहाय्याने कोणत्याही विचाराचा वा आदर्शाचा प्रचार केलेला नाही.

भारताने जगाला जे दान दिलेले आहे त्याचे नेमके वर्णन करू शकेल असा जर इंग्रजी भाषेत कोणता एखादा शब्द असेल, मानवजातीवर भारतीय साहित्याचा जो प्रभाव पडला आहे त्याचे नीट वर्णन करू शकेल असा जर कोणता एखादा शब्द इंग्रजी भाषेत असेल तर तो शब्द म्हणजे Fascination (मोहून जाणे, भारले जाणे, मोहिनी वा भुरळ पडणे) हा होय. माणूस एकदम थक्क होऊन प्रभावित होऊन जावा असा हा प्रकार नसतो. उलट, ह्याच्या अगदी विरुद्ध घडते–त्याचा अगदी हळूहळू, न कळता मानवमनावर अंमल बसत असतो.

अनेकांच्या दृष्टीला भारतीय विचार, भारतीय प्रथा, भारतीय आचार–

व्यवहार, भारतीय तत्त्वज्ञान, भारतीय साहित्य प्रथमदर्शनी चमत्कारिक वाटते. परंतु तेथेच न थबकता ते जर नेटाने अध्ययन करतील, मन लावून चिकाटीने भारतीय ग्रंथांचे अनुशीलन करतील, भारतीय आचार-व्यवहारांच्या मुळाशी असलेल्या महान तत्त्वांची नीट ओळख करून घेतील तर त्यांच्यापैकी शेकडा नव्याण्णव जण भारतीय विचारांच्या सौंदर्याने, भारतीय भावांनी मुग्ध होऊन गेल्याचे तुम्हाला आढळून येईल. अतिमंदपणे पडणाऱ्या, पडताना कुणाला न दिसणाऱ्या, न ऐकू येणाऱ्या, आणि तरीही विलक्षण परिणाम घडवून आणणाऱ्या प्रात:कालीन दवाप्रमाणे ह्या शांत, सहिष्णू, सोशिक, धर्मनिष्ठ जातीने विचारजगतात आपला अंमल बसविला आहे.

केवळ भारतातच माणूस्, आपल्या जमातीच्या छोट्याछोट्या देवतांवरून 'तुझा देव खरा की माझा देव खरा हे आपण एकमेकांशी लढाई करून ठरवू' असे म्हणून शेजाऱ्याशी झगडण्यास सरसावला नाही. लहानसहान देवतांवरून युद्धास प्रवृत्त होण्याची संकुचित मनोवृत्ती केवळ या भारतातच कधी निर्माण होऊ शकली नाही. ही सारी महान मूलतत्त्वें मानवाच्या अनंत स्वरूपावर अधिष्ठित असल्याकारणे त्यांच्यात हजारो वर्षांपूर्वीइतकीच आजही मानवजातीचे कल्याण करण्याची शक्ती वसत आहे.

भारताचा समस्त इतिहास म्हणजे ह्या एकाच मूल सूत्राचा ओजस्वी विस्तार होय. **"एकं सत् विप्राः बहुधा वदन्ति"** - एकच सत्ता विद्यमान आहे, जाणते तिलाच नाना नावे देतात. ह्या देशात त्या तत्त्वाची वारंवार पुनरूक्ती झाली आहे. परिणामी ते ह्या जातीच्या रक्तात भिनून गेले आहे. ह्या जातीच्या नसानसातून खेळत आहे, ह्या जातीच्या जीवनाचे एक अंगच बनून गेले आहे. अशा रीतीने ही भूमी दुसऱ्यांच्या धर्माविषयी द्वेष न बाळगणारी एक अद्भुत देश बनून गेली. ह्या सिद्धान्ताच्या बळानेच आम्ही आमच्या ह्या प्राचीन मातृभूमीत सर्व धर्मांना आणि सर्व संप्रदायांना

सादर आलिंगन देण्यास समर्थ झालो आहोत.

या भारतात वरवर पाहता परस्परविरोधी वाटतील असे अनेक संप्रदाय अस्तित्वात आहेत, आणि तरीही ते सगळेच्या सगळेच एकमेकांशी न झगडता खेळीमेळीने येथे नांदत आहेत. या अपूर्व घटनेचे एकमेव स्पष्टीकरण आहे–आमच्यातील हा परधर्माविषयी द्वेष भावनेचा अभाव.

इतर देशांतील चांगले शिकलेसरवरलेले लोकही नाक मुरडून आमच्या धर्माला मूर्तिपूजा (idolatry) म्हणत असतात. मी त्यांना तसे करताना बघितले आहे. पण त्यांच्या स्वतःच्या डोक्यात किती भयंकर खुळचट समजुती ठासून भरलेल्या आहेत ह्याचा ते बापडे कधी शांतपणे विचारच करून बघत नाहीत. तिथे अजूनही सर्वत्र हाच मनोभाव, हीच घोर कट्टरता, हीच स्वमतान्धता, हीच सांप्रदायिकता, मनाचा हाच भीषण संकुचितपणा आढळून येतो. त्यांच्या स्वतः जवळ जे आहे तीच काय ती साऱ्या जगातील एकमेव मौल्यवान गोष्ट होय! अर्थोपासना–पैशाची पूजा हाच त्यांच्या मते आयुष्याचा एकमेव सदुपयोग!

अरेरे, शिक्षणाचा इतका प्रसार होऊनही जगाची ही अशी अवस्था असावी ना? याचा अर्थच असा की, खरोखर पाहता जगात अजूनही शिक्षणाचा आणखी प्रसार होण्याची आवश्यकता आहे–जगात अजूनही अधिक सभ्यतेची आवश्यकता आहे. नव्हे, असेही म्हणता येईल की अद्यापि कुठेही सभ्यतेची सुरुवातदेखील झालेली नाही.

अजूनही मनुष्यजातीपैकी शेकडा ९९.९ लोक कमीअधिक असभ्य अवस्थेतच आहेत. पुष्कळ पुस्तकात आपल्याला ह्या साऱ्या गोष्टी लिहिलेल्या आढळतील, परधर्माविषयी द्वेष बाळगू नये वगैरे तत्त्वे ग्रंथान्तरी बरीच वाचावयास सापडतील, परंतु मी माझ्या अनुभवाने सांगतो की जगात हा मनोभाव खरोखर पाहता फारच कमी आहे. शेकडा नव्याण्णव लोकांच्या तर हे विचारही मनात येत नाहीत. जगात ज्या कुण्या देशात मी गेलो आहे तिथे बघितले की अजून परधर्मियांचा भयंकर छळ होत

असतो; नवीन गोष्टी शिकण्याविरुद्ध पूर्वी जे मुद्दे उपस्थित केले जात असत, तेच जुने मुद्दे आजही उपस्थित केले जात असतात. जगात जो काय परधर्माविषयी द्वेषाचा अभाव आणि धर्माविषयी जिव्हाळा आहे तो. खरे पाहता इथे, या आर्यभूमीतच विद्यमान आहे. आणखी कुठेही नाही.

आणि एवढ्याचसाठी जगाला हा पाठ घेण्याची, हा धडा शिकण्याची अतोनात आवश्यकता आहे–भारताकडून जगाने अजूनही हा परधर्माविषयी द्वेषाचा अभाव नव्हे, परधर्माविषयी उत्कट सहानुभूती शिकावयास हवी. शिवमहिम्नस्तोत्रात म्हटले आहे–"भिन्नभिन्न पर्वतांतून उगम पावणाऱ्या भिन्नभिन्न नद्या सरळ वा वाकड्यातिकड्या गतीने वाहत जाऊन अखंड समुद्राला जाऊन मिळतात, त्याचप्रमाणे, हे प्रभो, आपापल्या भिन्न भिन्न प्रवृतींच्या अनुरोधाने माणसे जे भित्रभिन्न धर्ममार्ग स्वीकारतात. ते कितीही वेगवेगळे दिसले, ते सरळ वा नागमोडी असले तरी अंती तुझ्याप्रतच येऊन पोहोचतात."

वेगवेगळया रस्त्याने जात आहेत खरे, परंतु सगळेजण जात आहेत एकाच ठिकाणी. कुणी नागमोडी रस्त्याने अंमळ वळसे घेत, तर कुणी सरळ मार्गाने थेट चालला असेल, परंतु अखेरीस, हे भगवन्, सगळेच तुझ्यानिकट येणार आहेत. तुम्ही त्या शिवाला केवळ शिवलिंगातच न बघता जेव्हा सर्वत्र पाहाल तेव्हाच तुमची शिवभक्ती आणि तुमचे शिवदर्शन ही पूर्ण झाली असे म्हणता येईल. जो त्या हरीला सर्व जीवात आणि सर्व भूतात बघतो, तोच खरा साधू, तोच खराखरा हरीचा भक्त होय. जर तुम्ही खरे शिवभक्त असाल तर तुम्ही त्या शिवाला सर्व जीवात आणि सर्व भूतात बघाल.

सर्व भेद नाहीसे होतील हे असंभव आहे. भेद राहतीलच. वैचित्र्याखेरीज, विविधतेखेरीज जीवनच शक्य नाही. विचारांमधील हा संघर्ष, हे वैचित्र्य, ही विविधताच ज्ञान, उन्नती वगैरेंचे मूळ होय. जगामध्ये अनंत प्रकारचे विरोधी भाव अस्तित्वात राहतीलच. परंतु म्हणून आपण

एकमेकांचा द्वेष करायला हवा, एकमेकांशी कलह करायला हवा असे मात्र नाही.

जे केवळ इथूनच या आपल्या मातृभूमीतूनच प्रचारित झाले आहे ते मूल सत्य आपल्याला सर्वांना फिरून नव्याने शिकावे लागेल. फिरून एकदा भारताला त्या सत्याचा साऱ्या जगभर प्रसार करावा लागेल. मी हे असे का म्हणत असेन? कारण एवढेच की, हे सत्य आमच्या केवळ शास्त्रग्रंथातच विद्यमान आहे असे नव्हे, आमच्या जातीच्या साहित्याच्या प्रत्येक क्षेत्रात, आमच्या जातीच्या जीवनात ते शिरलेले आहे, भिनलेले आहे. इथे, फक्त इथेच तद्नुसार रोजच्या जीवनात आचरण केले जात असते; आणि ज्याला डोळे आहेत असा प्रत्येकजण कबूल करील की इथल्याखेरीज आणखी कुठेच ते कृतीत आणले गेलेले नाही.

अशा रीतीने आपल्याला जगास धर्म शिकवावा लागेल. हा शांतभाव, ही तितिक्षा, ही सोशिकता, हा परधर्माविषयी द्वेषाचा अभाव, ही सहानुभूती, हा बंधुभाव हे महान घडे आबालवृद्ध, स्त्रीपुरुष, शिक्षित अशिक्षित, सर्व जातींचे आणि सर्व वर्णांचे लोक गिरवू शकतील– "तू एकच आहेस; लोक तुला निरनिराळ्या नावांनी आळवीत असतात – **एकं सत् विप्राः बहुधा वदन्ति**.

* * *

*मराठी सिनिअर (इयत्ता ८ ते १०)*

***विशेष सूचना :***

*१. प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.*

*२. कृपया विषयास धरून बोलावे.*

*३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे:*

*(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता: १० गुण (क) प्रभाव : १० गुण*

## ३. श्रद्धा आणि बल

ज्याचा स्वत:वर विश्वास नाही तो नास्तिक. जुना धर्म म्हणत असे की ज्याचा ईश्वरावर विश्वास नाही तो नास्तिक. नवा धर्म म्हणतो की ज्याचा स्वत:वर विश्वास नाही तोच नास्तिक.

जगाचा इतिहास हा स्वत:वर श्रद्धा असलेल्या काही थोड्या माणसांनी घडविलेला आहे. अशी श्रद्धाच आतील देवत्वाला बाहेर प्रकट करते. मग तुम्ही सर्वकाही करू शकता. तुमच्यामधील अनंत शक्तीला प्रकट करण्याचा पुरेसा प्रयत्न तुमच्याकडून झाला नाही तरच तुम्हाला अपयश येते. कोणतीही व्यक्ती किंवा राष्ट्र जेव्हा श्रद्धाहीन बनते तेव्हा मृत्यू ओढवतो.

श्रद्धा! श्रद्धा! श्रद्धा! स्वत: वरील श्रद्धा! ईश्वरावरील श्रद्धा! हेच महान बनण्याचे रहस्य आहे. तुमच्या पुराणांमधून वर्णिलेल्या तेहतीस कोटी देवांवर तुमची श्रद्धा असेल, तसेच परकीयांनी तुमच्यात वेळोवेळी प्रसृत केलेल्या सर्व देवतांवरही तुमची श्रद्धा असेल पण तुमची स्वत:वर जर श्रद्धा नसेल तर तुम्हाला मुक्ती लाभणे शक्य नाही.

तुम्हाला काहीही अशक्य आहे असे कदापि समजू नका. तसे समजणे ही घोर नास्तिकता आहे. तो घोर पाखंडीपणा आहे. पाप म्हणून जर काही असेल तर ते फक्त हेच – स्वत:ला किंवा इतरांना दुर्बल

म्हणणे अनावश्यक शब्द.

जसा तुम्ही विचार कराल, जसे तुम्ही चिंतन कराल तसेच तुम्ही व्हाल. जर तुम्ही स्वत:ला दुबळे समजाल तर तुम्ही दुबळेच व्हाल; तेजस्वी मानाल तर तेजस्वी व्हाल.

मुक्त तुमचे तुम्हालाच व्हावे लागेल. कुणाकडूनही मदतीची आशा बाळगू नका. माझी खात्री आहे, तुम्ही जर आपल्या गतजीवनाचा आढावा घेतलात तर तुम्हाला आढळून येईल की तुम्ही सारखे कुणाची तरी मदत मिळावी म्हणून व्यर्थ धडपडत होता, पण अशी मदत तुम्हाला कधीच मिळालेली नाही. जी काही मदत तुम्हाला कधी मिळाली आहे, ती सारी तुमच्या अंतरात्म्यातूनच – तुमच्या स्वत:तूनच.

'अंहं, हे मला जमायचे नाही' असे कदापि म्हणू नका. कारण तुम्ही स्वरूपत: अनंत आत्मा आहात. तुमच्या अनंत स्वरूपापुढे अनंत काल आणि अनंत अवकाशही काहीच नव्हेत. तुम्ही काहीही, काय हवे ते करू शकता कारण तुम्ही स्वरूपत: सर्वशक्तिमान आहात.

ईश्वराचे पुत्र तुम्ही, तुम्ही अमृताचे अधिकारी, पवित्र, पूर्ण. तुम्ही ह्या मर्त्यभूमीतील देवता, तुम्ही पापी? अशक्य. मानवाला पापी म्हणणेच महापाप. विशुद्ध मानवात्म्यावर तो मिथ्या कलंकारोप मात्र आहे. बंधूंनो, तुम्ही सिंहस्वरूप असूनही स्वत:ला मेषतुल्य का समजता? उठा, मृगराजांनो उठा, आणि आपण मेंढरे आहोत हा वृथा भ्रम झाडून टाका. तुम्ही जरामरणरहित, मुक्त आणि नित्यानन्दस्वरूप आत्मा आहात.

ह्या धडपडींची, ह्या चुकांची, अपयशांची तमा बाळगू नका; मी गायीला कधी खोटं बोलताना ऐकले नाही. पण ती नेहमी गायच राहते, कधी मनुष्य होत नाही. म्हणून या अपयशांची खंत बाळगू नका, क्षुल्लक पिछेहाटीबद्दल खेद करू नका. हजार वेळा आपल्या आदर्शाला धरून राहण्याचा प्रयत्न करा. आणि हजारही वेळा अपयशी झालात तरी फिरून

एकवार कंबर कसून प्रयत्न करा.

कपाळाला हात लावून आपल्या दुर्बलतेबद्दल सुस्कारे टाकीत बसणे हा काही ती दुर्बलता दूर करण्याचा उपाय नव्हे. ती दूर सारण्याचा उपाय आहे – बल, शक्ती. माणसात आधीच वसत असलेली शक्ती प्रकट होईल असे काही करा. त्याला तिचे स्मरण द्या, तिचे ज्ञान द्या.

एखाद्या बाँबगोळ्याप्रमाणे अज्ञानराशीवर आदळणारा उपनिषदांत जर कोणता एक शब्द असेल तर तो म्हणजे 'अभी:' निर्भयता.

तुम्ही बारकाईने पाहिले असल्यास तुम्हाला असे आढळेल की, उपनिषदांतील अवतरणांखेरीज दुसरे कोणतेही अवतरण मी कधीच दिलेले नाही. आणि उपनिषदांतील कल्पनांपैकी सामर्थ्याच्या कल्पनेचाच मी अधिक प्रचार केला आहे. वेद, वेदान्त व इतर सारे तत्त्वज्ञान ह्या सगळ्यांचे सार 'सामर्थ्य' या एकाच शब्दात सामावलेले आहे.

माझ्या तरुण मित्रांनो, सामर्थ्यसंपन्न व्हा.

प्रत्येक पुरुषाला वा स्त्रीला, मुलाला वा मुलीला माझा केवळ हा एकच प्रश्न आहे. तुम्ही बलवान आहात ना? तुमच्यात बलाचा संचार होत आहे ना? कारण केवळ सत्यच बल प्रदान करू शकते हे मी जाणून आहे.

ह्या भवरोगावर बल हेच एकमेव रामबाण औषध आहे.

हे एक महान सत्य आहे. बल हे सुख आहे, चिरंतन व शाश्वत जीवन आहे. दुर्बलता म्हणजे सतत दु:खकष्ट होय, दुर्बलता म्हणजे मृत्यू होय.

यश मिळवण्यासाठी, सिद्ध होण्यासाठी कमालीची चिकाटी हवी, प्रचंड इच्छाशक्ती हवी, खूप मनोबल हवे. असला चिकाटीचा साधक म्हणत असतो – "मी समुद्र पिऊन जाईन, माझ्या इच्छाशक्तीने पर्वत

चूर्ण होऊन जातील." असल्या तऱ्हेचे तेज, असल्या तऱ्हेची इच्छाशक्ती बाळगा, खूप कठोर साधना करा, तुम्हाला त्या परमपदाची प्राप्ती झालीच पाहिजे.

माणसे हवी आहेत, इतर सर्वकाही आपोआप जुळून येईल, परंतु सशक्त, उत्साही, श्रद्धावान व निष्कपट अशी तरुण माणसे हवी आहेत. असे शंभर तरुण मिळाले तरी सर्व जगात क्रांती घडविता येईल.

अज्ञानात खितपत केवळ उदरभरणासाठी जगण्यापेक्षा मृत्यू श्रेयस्कर. पराजयाचे जिणे जगण्यापेक्षा रणमैदानावर मरणेच चांगले.

पुढे व्हा. काहीतरी वीरोचित कार्य करा. तुम्हाला मुक्ती प्राप्त झाली नाही तरी त्याचे एवढे मोठे काय आहे? किंवा तुम्हाला अनेकदा नरकवास भोगावा लागला तरी त्याचेही एवढे मोठे काय आहे?

मागे वळून पाहण्याची गरज नाही. पुढे, पुढे चला! आपल्याला अमर्याद सामर्थ्याची, अपरंपार उत्साहाची, उदंड धैर्याची आणि निस्सीम धीराची गरज आहे, ह्या साऱ्या गोष्टी असतील तरच महत्कार्ये सिद्धीस जातील.

हताश होऊ नका. तलवारीच्या धारेवरून चालण्याप्रमाणे मार्ग अत्यंत बिकट आहे खरा, तरीही निराश होऊ नका. उठा, जागे व्हा आणि आपले ध्येय, आपले लक्ष्य गाठा.

बंधो, तू कशाला रडतोस? तुला मृत्यू नाही किंवा व्याधी नाही. मग हे बंधो, कशाला रडतोस? तुझ्यात परिवर्तन होईल किंवा तुझा मृत्यू होईल असे कधी कुणी सांगितले नाही! तू सत्यस्वरूप आहेस ! ...स्वत:च्या स्वरूपात प्रतिष्ठित हो.

लोक काहीही म्हणोत, आपली जी निश्चित मते आहेत, त्यांना चिकटून राहा आणि मग जग तुमच्या पायाशी लोळण घेईल याबद्दल

खात्री असू द्या; लोक म्हणतात, ‘याच्यावर विश्वास ठेवा, त्याच्यावर विश्वास ठेवा’, पण मी म्हणतो, ‘आधी स्वत:वर विश्वास ठेवा.’ हाच उपाय आहे. आत्मविश्वास असू द्या. सारी शक्ती तुमच्यामधेच आहे, हे जाणून घ्या आणि ती प्रकट करा. म्हणा की सर्वकाही करू शकण्याचे सामर्थ्य माझ्या ठिकाणी आहे. ‘विष नाही, विष नाही’ असे खंबीरपणे म्हटल्यास सापाचे विषदेखील बाधत नाही.

एकदा मी काशीला असताना मला अशा एका रस्त्यावरून जाण्याचा प्रसंग आला की ज्याच्या एका बाजूला एक उंच भिंत होती व दुसऱ्या बाजूला पाण्याने भरलेला एक मोठा तलाव होता. तलावाजवळ पुष्कळ माकडे राहत होती. काशीची माकडे मोठी आडदांड व रागीट असतात. मला पाहून त्या माकडांच्या मनात आले की त्या रस्त्यावरून मला जाऊ द्यायचे नाही! म्हणून मी पुढे जाऊ लागताच माझा पाय धरून ती खेकसू-ओरडू लागली. ती जवळ आलेली पाहून मी धावू लागलो, पण मी जितक्या वेगाने धावत होतो त्यापेक्षा जास्त वेगाने ती माझ्या अंगावर धावून येऊ लागली व मला चावू लागली. त्यांच्या तावडीतून सुटणे मला अशक्यच वाटू लागले, पण तितक्यात समोरून येणाऱ्या एका अनोळखी माणसाने मला जोराने ओरडून म्हटले, "माकडांना तोंड द्या." मी तसाच परत फिरलो आणि माकडांसमोर ताठ उभा राहिलो. त्याबरोबर ती मागे हटली व पळून गेली. आयुष्यभर लक्षात ठेवण्यासारखा हा धडा आहे. भयावह अशा ज्या ज्या गोष्टी असतील त्यांना तोंड द्या. ठामपणे तोंड द्या.

उठ आणि युद्ध कर! एक पाऊलही माघार घेऊ नकोस. हीच मुख्य गोष्ट आहे. काहीही होवो, तू शेवटपर्यंत लढ. आकाशातील तारे खाली पडू देत! सारे जग आपल्या विरुद्ध उभे ठाकू दे! मरण म्हणजे केवळ वस्त्र बदलणे आहे. त्याचे काय? म्हणून तू लढ. भेकड होऊन तुमचा काही फायदा होणार नाही. माघार घेतल्याने तुम्हाला कोणतेच संकट टाळता येणार नाही. झुंजत झुंजत मरा. तू अनंत आहेस. तुला

जन्म नाही, मृत्यू नाही. तू अनंत आहेस, म्हणून तुला गुलाम बनणे शोभत नाही. उठ! जागा हो! उभा रहा आणि लढ.

* * *